| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २७७ वा | सोमवार दिनांक १९ जानेवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### मित्राचे घरी चोरी करणारे मित्रानां स्थानिक गुन्हे शाखेने केले गजाआड

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांचे आदेशावरुन स्थानिकगुन्हे शाखेचे पथक धाराशिव जिल्ह्यातील मालाविषयी गुन्हे उघडकीस आणणेकामी धाराशिव शहरात पेट्रोलिंग करीत असताना पथकास माहिती मिळाली की, पोलीस ठाणे धाराशिव शहर गुरनं ५७०/२०२५ कलम ३३१(४), ३०५(-) बीएनएस हा गुन्हा स्वप्नील सतीष जेटीथोर, श्वेत सुनिल चिलवंत, निखील किरण सोनवणे सर्व रा. धाराशिव यांनी केला आहे अशी माहिती मिळाल्याने पथकाने धाराशिव शहरात नमुदांचा शोध घेताल असता ते धाराशिव शहरात मिळन आल्याने त्यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे नमुद गुन्ह्याचे अनुषंगाने चौकशी केली असता त्यांनी सांगीतले की सदर गुन्ह्यातील फिर्यादी शुध्दोधन गायकवाड यांने यातील संबंधितास उसने पैसे देवून त्याचे जास्त व्याज घेतले होते म्हणुन संगणमत करुन फिर्यादीचे घरी कुरणेनगर येथे चोरी केली असल्याचे कबुल केले. नमुदांनी ताब्यातुन सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकुण ७९,७८० चा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. चे पोनि-श्री. विनोद इज्जपवार यांचे आदेशावरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सचिन खटके, पोलीस हावलदार- नितीन जाधवर, बबन जाधवर, चालक पोलीस हावलदार महेबुब अरब, रोहीत दंडनाईक यांच्या पथकाने केली आहे.

### शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जनार्धन रा. कौडगाव ता.परंडा जि. धाराशिव यांनी दि.१६.०१.२०२६ रोजी बसस्थानक चौक कौडगाव येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे लोखंडी तलवार एकुण ५०० किंमतीची ही विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला परंडा पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद तलवार जप्त करुन फिर्यादी नामे-राहुल चतुर्भुज खताळ, पोलीस अमंलदार नेमणुक पोलीस ठाणे परंडा यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह कलम २२३ भा.न्या.सं.सह कलम १३५ मपोका अन्वये परंडा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१६ जानेवारी रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २०० कारवाया करुन १,३४,१५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## महिलांच्या आरोग्यासाठी ऐतिहासिक पाऊल महाराष्ट्रात देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक' सुरु

### धाराशिव येथे पहिल्याच दिवशी २२१ महिलांची तपासणी

धाराशिव,दि.१६ जानेवारी(जिमाका) महिलांच्या आरोग्याला केंद्रस्थानी ठेवत महाराष्ट्र राज्यात देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक)' सुरू करण्यात आले असून,हा उपक्रम महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरत आहे.श्री प्रकाश आबिटकर,मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण,महाराष्ट्र राज्य आणि राज्यमंत्री श्रीमती मेघना बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून राज्यातील सर्व शासकीय रुग्णालये तसेच शहरी भागांमध्ये हे क्लिनिक सुरू करण्यात आले आहेत.

या अभिनव उपक्रमाला राज्यभरातील महिलांकडून मोठ्या प्रमाणावर सकारात्मक प्रतिसाद मिळत असून,महिलांनी समाधान व कृतज्ञता व्यक्त केली आहे.मेनोपॉज हा आजार नसून महिलांच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे.मात्र या काळात महिलांना शारीरिक व मानसिक आधाराची नितांत गरज असते.प्रत्येक महिलेला योग्य सल्ला,उपचार आणि सन्मान मिळावा,या उद्देशाने मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आले आहेत. असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

रजोनिवृत्ती हा महिलांच्या आयुष्यातील अत्यंत जिव्हाळ्याचा आणि संवेदनशील टप्पा असून,या काळात होणारे शारीरिक बदल, मानसिक ताण,हार्मोनल असंतुलन, हाडांचे आजार,झोपेचे विकार व नैराश्य याकडे आजवर अनेकदा दुर्लक्ष झाले होते.यामुळे महिलांना शारीरिक,मानसिक,कौटुंबिक आणि सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत होते.या समस्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी समुपदेशन व योग्य उपचाराचा प्रभावी पर्याय शासनाने उपलब्ध करून दिल्याबद्दल समाजातून कृतज्ञता व्यक्त होत आहे.

ही गरज ओळखून श्रीमती मेघना बोर्डीकर यांनी महिलांसाठी दर बुधवारी विशेष मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्याबाबत राज्यातील सर्व जिल्ह्यांतील शासकीय आरोग्य संस्थांना सूचना दिल्या.त्यानुसार जिल्ह्यात शहरी विभागातील जिल्हा रुग्णालय अंतर्गत उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालये अशा एकूण १३ आरोग्य संस्थांमध्ये,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली १४ जानेवारी २०२६ रोजी मकर संक्रांतीचे औचित्य साधून 'मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक)'ची अधिकृत सुरुवात करण्यात आली.या दिवशी एकूण २२१ महिलांची तपासणी करण्यात आली.

या क्लिनिकच्या माध्यमातून महिलांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, मानसिक आरोग्य समुपदेशन,हाडे, हृदय व हार्मोन तपासणी, औषधोपचार,आहार व जीवनशैलीविषयक मार्गदर्शन अशा सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.महत्त्वाची बाब म्हणजे,देशात प्रथमच अशा प्रकारचे मेनोपॉज क्लिनिक सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.महिलांच्या आरोग्याबाबत महाराष्ट्राने उचललेले हे पाऊल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

मकर संक्रांतीनिमित्त महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत असून,महिलांच्या आरोग्याची गोड भेट म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.संवेदनशील व आरोग्यदृष्टी असलेल्या नेतृत्वाबद्दल महिलांनी श्रीमती बोर्डीकर यांचे कौतुक करत आभार व्यक्त केले आहे.महिलांचे आरोग्य सक्षम झाले,तर कुटुंब,समाज आणि राज्य निश्चितच सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. तरी जिल्ह्यातील सर्व महिलांनी आपल्या नजीकच्या शासकीय रुग्णालयात दर महिन्याच्या बुधवारी भेट देऊन 'मेनोपॉज क्लिनिक (रजोनिवृत्ती क्लिनिक)'चा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांनी केले आहे.

## जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या प्रेरणेतून गुजरातमध्ये ३१२ कुटुंबांचा सनातन हिंदू धर्मात विधिवत पुनर्प्रवेश !



कळंब (प्रतिनिधी)-जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली गुजरात राज्यातील वलसाड जिल्ह्यात ३१२ कुटुंबांचा विधिवत हिंदू धर्मात पुनर्प्रवेश सोहळा पार पडला. धरमपूर तालुक्यातील हनुमंतमाळ येथे झालेल्या या भव्य आणि भावनिक सोहळ्यात सनातन हिंदू परंपरेनुसार धार्मिक विधी पार पाडण्यात आले.

विविध आमिषे, फसवणूक व भुलथापांमुळे पूर्वी अन्य धर्मात गेलेली ही कुटुंबे आत्मपरीक्षण करून पुन्हा आपल्या मूळ सनातन हिंदू धर्मात परतली. या सोहळ्यामुळे उपस्थितांमध्ये भक्ती, श्रद्धा आणि आत्मिक समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या महाअभियानांतर्गत आतापर्यंत १,५३,३४३ कुटुंबांनी हिंदू धर्मात पुनर्प्रवेश केला असल्याची माहिती देण्यात आली. गरिबी, अज्ञान व परिस्थितीचा गैरफायदा घेत नियोजनबद्ध पद्धतीने धर्मांतरण केलेल्या हिंदू बांधवांना पुन्हा आपल्या धर्मात सन्मानाने सामावून घेण्याचे हे कार्य सातत्याने सुरू आहे.

या पुनर्प्रवेश सोहळ्यात गोमाता पूजन, होम-हवन आदी धार्मिक विधी तीन तास चालले. यानंतर सर्व उपस्थित कुटुंबांना जगद्गुरुंच्या हस्ते शपथ देण्यात आली.

शपथेतील आशय असा होता -

मी यापुढे हिंदू धर्माची उपासना, रीतिरिवाज, प्रथा व परंपरांचे तंतोतंत पालन करेन. कोणत्याही परिस्थितीत अन्य धर्म स्वीकारणार नाही. मी जन्माने हिंदू आहे आणि हिंदू म्हणूनच जीवन व्यतीत करीन.

शपथविधीनंतर जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले,

मिशनऱ्यांकडून विविध आमिषे दाखवून विशेषतः आदिवासी बांधवांचे धर्मांतरण केले जाते. धर्म बदलूनही त्यांची मूळ नावे, जात आणि कागदोपत्री धर्म बदलला जात नाही, जेणेकरून शासकीय सवलती मिळत राहतील. हिंदू धर्मातील उपासना पद्धती बदलल्याने अपराधी वाटणारी अनेक मंडळी आमच्याकडे आली, म्हणून त्यांना पुन्हा पूर्वीची उपासना पद्धती स्वीकारण्याचा मार्ग आम्ही खुला करून दिला.

या कार्यक्रमास धरमपूरचे आमदार अरविंदभाई पटेल, अहवा-डांगचे आमदार विजयभाई पटेल, उमरगामचे आमदार रमणभाई पाटकर, जिल्हा महामंत्री महेंद्र चौधरी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सनातन हिंदू संस्कृतीचे जतन, संरक्षण व जागृतीसाठी सुरू असलेले हे कार्य समाजात नवचैतन्य निर्माण करणारे ठरत असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

## निवडणूक काळात लाऊडस्पीकर वापरावर प्रतिबंध



धाराशिव,दि.१६ जानेवारी (जिमाका) जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर केल्याने त्या दिवसापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे.निवडणूक प्रक्रिया शांततेत,निर्भय व न्याय्य वातावरणात पार पडावी,या दृष्टीकोनातून निवडणूक काळात लाऊडस्पीकरच्या वापरावर प्रतिबंध घालण्यात आले आहे.

भारत निवडणूक आयोगास भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, निवडणुका कोणत्याही अडथळ्याविना व शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक कालावधीत ध्वनीक्षेपकांच्या वापरावर जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी प्रतिबंध केला आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून हे आदेश दिले आहेत.

या आदेशानुसार,जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या हद्दीत कोणत्याही वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून त्याचा वापर सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत संबंधित पोलीस स्टेशन अधिकाऱ्यांची रीतसर परवानगी घेऊनच करता येईल.मात्र, ध्वनीक्षेपकाचा वापर करताना वाहन चालू ठेवणे प्रतिबंधित राहील.

तसेच,वाहनावर बसवलेले असोत किंवा अन्य प्रकारचे असोत,सर्व प्रकारच्या ध्वनीक्षेपकांचा वापर दररोज सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंतच परवानगीयोग्य राहील.

सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, निवडणूक उमेदवार किंवा ध्वनीक्षेपकाचा वापर करणाऱ्या व्यक्तींनी ध्वनीक्षेपक वापरासंबंधीची परवानगी व तपशील संबंधित मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तसेच नजिकच्या पोलीस स्टेशनला देणे बंधनकारक राहील.

या आदेशाचा कोणीही भंग केल्यास संबंधित व्यक्ती भारतीय न्याय संहितेतील तरतुदींनुसार शिक्षेस पात्र ठरणार आहे.हा बंदी आदेश दिनांक १३ जानेवारीपासून ते दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या हद्दीत अंमलात राहील.

## जिल्ह्यात आयुष्मान कार्डसाठी विशेष E-KYC मोहिम लाभार्थ्यांना मिळणार आरोग्य सेवांचा लाभ

धाराशिव (जिमाका )- आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत जिल्ह्यात लाभार्थ्यांच्या आयुष्मान कार्डसाठी E-KYC मोहिम राबविण्यात येणार आहे.या योजनेचा सर्वकष आढावा घेण्यासाठी १ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

सध्या जिल्ह्यात १५.२३ लाख लाभार्थी असून त्यापैकी ७.३१ लाख लाभार्थ्यांचे आयुष्मान कार्ड E-KYC केले आहे. लाभार्थ्यांची E-KYC करण्यासाठी आशा कर्मचारी,स्वस्त धान्य दुकान चालक व आपले सरकार सेवा केंद्र कर्मचारी यांना यशस्वी ए-घधउ साठी २० रुपये आणि आयुष्मान कार्ड वितरणासाठी १० रुपये मानधन देण्यात येणार आहे.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रति कुटुंब वर्षाला ५ लाख रुपये मोफत शस्त्रक्रिया व उपचाराचा लाभ मिळणार असून,जिल्ह्यातील २७ खाजगी आणि १३ शासकीय,एकूण ४० रुग्णालयांमध्ये तसेच महाराष्ट्रातील सुमारे २३०० रुग्णालयांमध्ये हा लाभ उपलब्ध आहे.

मोफत आयुष्मान कार्ड ग्रामपंचायत स्तरावर,CSC केंद्रे,आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले जातील.तसेच ७० वर्षांवरील नागरिकांनी वय वंदना कार्ड काढून वैयक्तिक व कौटुंबिक विमा ५ लाख रुपयांचा लाभ घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. ही विशेष मोहिम ०९ जानेवारीपासून ते ३१ जानेवारी २०२६ पर्यंत राबविण्यात येणार असून,लाभार्थी गाव,वार्ड,वस्ती,शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जाऊन E-KYC पूर्ण करू शकतात.तसेच आयुष्मान ॲप वापरून लाभार्थी स्वतः देखील E-KYC पूर्ण करू शकतात. जिल्ह्यात आयुष्मान कार्डचे ए-घधउ जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष यांच्या मार्गदर्शनाखाली गावनिहाय नियोजन करून ३१ जानेवारी २०२६ अखेर सर्व लाभार्थ्यांचे १०० टक्के E-KYC पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर यांनी दिली.

## 'निवडीपासून निधीपर्यंत एकहाती नेतृत्व' - अर्चनाताई पाटील यांच्या धडाकेबाज नियोजनातून जिल्हा परिषद-पंचायत समिती रणनिती, विकासकामांना वेग!



धाराशिव( रामेश्वर डोंगरे ) जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अर्चनाताई पाटील यांनी उमेदवारी निवडीची पूर्ण धुरा स्वतःच्या हातात घेतल्याने राजकीय वर्तुळात नव्या उर्जेचे वातावरण निर्माण झाले आहे. केवळ उमेदवार ठरवणे नव्हे, तर योग्य उमेदवार, योग्य ठिकाणी या तत्वावर त्यांची टीम अत्यंत कौशल्याने काम करत आहे.

उमेदवार निवड - अर्चनाताईंच्या नेतृत्वाखाली प्रत्येक गटात उमेदवारांची काटेकोर छानणी सुरू आहे. जनतेशी थेट संपर्क, सामाजिक कामांचा आढावा, विकासकामांतील सहभाग, स्वच्छ प्रतिमा, संघटन कौशल्य आणि युवकांना संधी-या सर्व निकषांवर उमेदवार तपासले जात आहेत. निवडणूक जिंकणारा नव्हे, तर जनतेसाठी झटणारा उमेदवार हवा हा स्पष्ट संदेश त्यांनी दिला आहे.

**कोडगाव (बावी) रस्त्याचे काम सुरू**

कोडगाव येथील खराब रस्त्याच्या दुरुस्तीचे काम अखेर प्रत्यक्षात उतरले आहे. नागरिकांच्या सातत्यपूर्ण मागणीला मान्यता देत खोदकाम व सुधारणा काम जोरात सुरू असून जेसीबीच्या माध्यमातून रस्ता समतल करण्याचे काम वेगाने चालू आहे. या कामामुळे परिसरातील वाहतूक सुलभ होणार असून शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**'काम आधी, राजकारण नंतर' - अर्चनाताईंचीकार्यशैली**

निवडणुकीच्या तोंडावरही अर्चनाताई पाटील विकासकामांचा प्रत्यक्ष आढावा घेत आहेत. कुठे काम थांबले आहे, कुठे निधी अडकला आहे, कुठे तातडीची गरज आहे - यावर स्वतः लक्ष देऊन पाठपुरावा केला जात आहे. दवाखाने, रस्ते, पाणीपुरवठा, स्मशानभूमी, अंतर्गत गल्ल्या, शेतरस्ते अशा मूलभूत प्रश्नांवर त्वरित निर्णय घेतले जात आहेत.

**संघटन मजबूत, जनतेचा विश्वास वाढतोय**

जिल्हाभर दौरे, आढावा बैठका, कार्यकर्त्यांशी थेट संवाद आणि गावागावात सुरू असलेली विकासकामे यामुळे संघटन अधिक मजबूत होत आहे. निवडणूक ही केवळ मतांची लढाई नसून विश्वासाची परीक्षा आहे, हे अर्चनाताईंच्या कामातून स्पष्ट दिसते.
एकूणच, उमेदवारी निवडीत काटेकोरपणा, विकासकामांना प्राधान्य आणि जनतेशी थेट नाळ - या त्रिसूत्रीवर अर्चनाताई पाटील जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीत नवीन मानक निर्माण करत आहेत.
धाराशिव जिल्ह्याच्या राजकारणात हा वेग आता थांबणारा नाही! असे चित्र दिसून येत आहे.

## निवडणूक काळात सार्वजनिक मालमत्तांचे विद्रुपीकरण करणाऱ्यावर होणार कारवाई

धाराशिव, (जिमाका)- जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक-२०२६ संदर्भात प्रशासनाने सार्वजनिक मालमत्ताचे विद्रुपीकरण करण्यासंबंधी कडक आदेश जारी केले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून आदर्श आचारसंहिता लागू असल्याने,जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया शांततेत,निर्भय व न्याय्य वातावरणात पार पडावी यासाठी जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी हे आदेश दिले आहेत. निवडणूक कालावधीत जिल्ह्यातील शासकीय व निमशासकीय सार्वजनिक मालमत्ता यांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात विद्रुपीकरण होऊ नये,यासाठी कडक निर्बंध घालण्यात आले आहेत. यामध्ये होर्डिंग्ज,बॅनर्स,पोस्टर्स तसेच भिंतीवर जाहीरात प्रदर्शित करताना संबंधित स्थानिक प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. परवानगी संपल्यानंतर हे साहित्य तात्काळ काढून टाकणे व मालमत्ता पूर्ववत करणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये हा आदेश जारी केला असून, हा आदेश १३ जानेवारीपासून ते ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात अंमलात राहील.या आदेशाचा उद्देश निवडणूक प्रक्रियेत सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण व सुव्यवस्था राखणे हा आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## लातूरातील विजयाचे श्रेय जनतेला,पक्षाला नाही..!

लातूर शहरमहानगरपालिका निवडणुक निकाला नंतर विविधजन आपआपल्यापरिने मत व्यक्त करीत आहेत. असे असले तरी काँग्रेस असो किंवा भाजपा यांना श्रेय घेण्याची आवश्यकता नाही तर सर्व श्रेय लातूरातील मतदार जनतेला दिले पाहिजे. त्यांनी घेतलेला निर्णयामुळे जय-पराजय झाला हे लक्षात घेतले पाहिजे. लातूर महानगरपालिकेची निवडणुक जाहिर झाली, त्यावेळी भाजपाची चांगली स्थिती होती. सकारात्मक वादळ निर्माण झाले होते. कालांतराने यात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष यांचा दौरा झाला त्यांनी जे भाषण केले त्यामुळे वातावरण उलट दिशेने फिरले. त्यामुळे काँग्रेसला यश मिळाले. काँग्रेस प्रचारात आघाडी घेत होती. मात्र यात चव्हाण यांच्या वक्तव्यामुळे भर पडली. यामुळे काँग्रेसला मोठ्या प्रमाणात यश मिळाले. ही बाब काँग्रेसने हे विसरून चालणार नाही. भाजपाने सुद्धा राजकारण केले. आर्चना पाटील चाकूरकर यांच्या हाती स्थानिक म्हणून प्रचारकार्याचे सुत्र दिली, कालांतराने माजी मंत्री तथा विद्यमान आमदार संभाजीराव पाटील यांच्या हाती दिली. हा बदल जनतेला खपणारा नव्हता. याची उघड चर्चा झाली, त्याकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. भाजपाला जे काही यश मिळाले त्याचा गौरव करू नये. मुळात दोन्ही पक्षाने काँग्रेस किंवा भाजपाने आपलीच बाजू भक्कम तयारी केली होती. चांगल्या सभा झाल्या म्हणून जनतेनी स्विकारले असे समजू नये. दोघांनाही जनतेनी तारले आहे हे दुर्लक्षित करून चालणार नाही. भाजपाचा तसा पराभव नाही. उलट मोठी जबाबदारी आली आहे. लातूरमध्ये विरोधीपक्ष म्हणून महानगरपालिकेत काम करणे म्हणजे आवघड आहे. लोकप्रियता मिळवुन घेण्यासारखे आहे. आता भाजपावर विरोधीपक्ष म्हणून जबाबदारी आली आहे. हे मोठे न पेलवणारे काम जिद्दीने करावे लागेल. आजची परिस्थिती उद्या राहात नाही. बदलती असते. त्यामुळे जय-पराजयाचा विचार न करता आता शहर विकासाचे कामे हाती घेतली पाहिजेत. सध्याला काँग्रेसला वाटत असेल आम्हाला मोठ्या प्रमाणात स्विकारले आहे. लोकनेते, विकासपुरूष विलासराव देशमुख यांच्या बाबत जे चव्हाण यांनी उद्गगार काढले त्याला उत्तर जनतेनी दिले आहे. याचा अर्थ काँग्रेसवर सर्वाधिक प्रेम आहे असे समजणे योग्य ठरणारे नाही. भावनिक बाबीला हात घालणे किती महागात पडले हे भाजपाला काळले असेल. राज्याच्या मुख्यमंत्र्यानी चव्हाण यांच्या बोलण्यावर पडदा टाकण्याचा मोठा प्रयत्न केला त्याला फारसे यश आले नाही हे उघड होते. जनतेनी सुद्धा विचार केला पाहिजे की, सर्वत्र भाजपाच्या हाती महानगरपालिका दिली. मुंबई युतीच्या हाती दिली, आपण मात्र त्या विरोधात कल दिला. आपली चुक तर नाही ना झाली! असे मनाला विचारले पाहिजे. लातूर शहर हे वाढते शहर आहे. लोकनेते विलासराव देशमुख यांनी राज्यात काय देशात लातूरचे नाव केले. कशामुळे केले तर विकासाच्या पॅटर्न मुळे! विकासाचा पॅटर्न सर्वांना दिला, तसा पॅटर्न आता निर्माण करण्याचा संकल्प केला पाहिजे. टिका करण्यापेक्षा, समोरच्यापेक्षा आपली रेघ लांब करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. टिका महागात पडते हे आता सर्वांना कळाले असेल. त्यामुळे अनुभवी नेत्याची गरज आहे. विकासपुरूष विलासराव देशमुख किंवा गोपीनाथ मुंडे या दोघांचे विचाराने अंगीकारले तर तर यश मिळते हे आलिकडील नेते मंडळी विसरत चालले आहेत. मुळात राजकारण हे सकारत्मक खेळले पाहिजे. मनात वाईट हेतूने राजकारण करण्याचा प्रयत्न केला तर त्याचे परिणाम योग्य ठरणारे नसतात. त्यामुळे लातूर महानगरपालिकेचा निकाल व या काळातील घटनेचा अभ्यास केला तर आगामी राजकारणात सकारात्मक परिणाम दिसून येतील. एकचुक म्हणजे बोलणे किती महागात पडू शकते विपरीत घडू शकते हे अनेकांना कळाले असेल. राजकारण जातीचेही किती महागात पडू शकते किंवा फायद्याचे ठरू शकते याचा अभ्यास या निवडणुक काळात करायला मिळाला आहे. त्यामुळे सावध असे, यापुढे वागायाला शिकविणारी ही निवडणुक पार पडली. राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुक निकाल व लातूररातील निकाला बाबत चिंतन झाले पाहिजे. राजकारण करणाऱ्यांनी सुद्धा कधी परिणाम काय होईल याचे ज्वलंत उदा. लातूर महानगरपालिकेची निवडणुक निकाला आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. लातूर शहर महानगरपालिकेत आता काँग्रेस पक्षाला सर्वाधिक विकास साधावा लागणार आहे. विकासाची गती तेज करावी लागणार आहे. भाजपाकडे जाणारी महानगरपालिका काँग्रेसच्या ताब्यात आली आहे. एकट्या विद्यमान आमदाराने खेचून आणली आहे. ही बाब दुर्लक्षित करता येत नाही. सर्वाधिक स्थिती विचार करायाला लावणारी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची झाली आहे. शरद पवार यांची तुतारीला मोठे अपयश आले आहे. एकही जागा मिळविता आली नाही. अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला एक जागा मिळाला ती ही पुर्वीचे कट्टर काँग्रेसचे होते. त्यांनी काँग्रेसच्या विचाराने महानगरपालिकेत पुर्वी विकास केला हे लक्षात घेता जनतेनी निवडले आहे. याचा अर्थ हा विजय अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा आहे असे समजणे योग्य वाटणारे नाही. लातूरात भाजपा विरूद्ध काँग्रेस अशी सरळ लढत पार पडली आहे. त्यामुळे याचे विश्लेषन अधिक कोणीही करणे योग्य ठरणारे नाही. काँग्रेसने तर अजिबात श्रेय लाटण्याचा प्रयत्न करू नये. जर भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आले नसते तर काय स्थिती झाली असती हे केवळ विचार केला तर कळणार आहे. वास्तविक सध्याला कोणी कोणाला सांगण्याची गरज नाही. अनेक बाबी सर्वांना कळाल्या आहे. आता जिल्हापरिषद व पंचायत समितीची निवडणुक पार पडणार आहे. त्यामुळे या निवडणुकीत काँग्रेसला यश मिळेल असे नाही. नागरिकांचा कौल कधी कोणाकडे वळेल हे सांगता येत नाही. त्यामुळे लातूर महानगरपालिकेची निवडणुक ही डोळ्यात अंजन घालणारी आहे. या निवडणुकीकडे अभ्यास म्हणून पाहिले पाहिजे. तरच यशस्वी राजकारण खेळण्यात मदत होणार आहे. ही निवडणुकील यश व अपयश हे जनतच्या प्रयत्नाचे प्रतिक आहे.

# 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने विविध उपक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### हिंद दी चादर कार्यक्रमाच्या प्रचारासाठी विविध शाळा सहभागी

### वक्तृत्व स्पर्धेत कु. नियती भालेराव हिने पटकावला प्रथम क्रमांक






**नांदेड/प्रतिनिधी :-** हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धीसाठी नांदेड जिल्ह्यातील शाळा आज चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या उत्साही जयघोषाने दुमदुमून गेल्या. प्रभातफेऱ्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी या घोषणांनी शाळा व परिसर भारावून टाकत सर्वत्र देशभक्तीमय वातावरण निर्माण केले.

जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये प्रभातफेऱ्यांच्या माध्यमातून हिंद-दी-चादर कार्यक्रमाची प्रभावी प्रचार-प्रसिद्धी करण्यात येत असून, या उपक्रमास विद्यार्थ्यांचा मोठ्या उत्साहाने सहभाग लाभत आहे. या माध्यमातून कार्यक्रमाबाबत व्यापक जनजागृती होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

१७ रोजी हुतात्मा जयंतराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हिमायतनगर (जि. नांदेड) येथे हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा सवना (ज.) येथेही वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. येथील विद्यार्थिनी कु. नियती भालेराव हिने प्रथम क्रमांक पटकावला. तसेच नांदेड तालुका, हिमायतनगर तालुका, देगलूर तालुका आदी ठिकाणी अनेक शाळांमध्ये प्रभातफेरी, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. नांदेड येथे तालुकास्तरीय गायन स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले.

या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये निबंध, चित्रकला, वक्तृत्व, गायन आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या त्याग, बलिदान व धर्मनिष्ठेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या अनुषंगाने हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतली नांदेड जिल्हाधिकाऱ्यांची भेट



**नांदेड/प्रतिनिधी :-** हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी मोदी मैदान, नांदेड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनामार्फत काटेकोर नियोजन करण्यात आले असून, त्या अनुषंगाने हिंगोली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात भेट दिली. यावेळी नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी हिंद-दी-चादर कार्यक्रमाच्या आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाने केलेल्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती देत चर्चा केली. तसेच कार्यक्रमाच्या विविध बाबींवर समन्वय व व्यवस्थापनाबाबत विचारविनिमय करण्यात आला. हिंगोली जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनीही या कार्यक्रमाच्या अनुषंगाने हिंगोली जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियोजनाची माहिती दिली. या प्रसंगी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी अविरत महसूल या पुस्तिकेची प्रत भेट देऊन राहुल गुप्ता यांचे स्वागत केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, कार्यकारी अधिकारी तथा हिंद दी चादर शहीदी समागम कार्यक्रमाचे शासकीय समन्वयक जगदीश सकवान, तहसीलदार आनंद देऊळगावकर आदी अधिकारी उपस्थित होते.

# फॅटी लिव्हरची समस्या दूर करतात 'या' ४ प्रकारच्या बिया, दररोज करा सेवन









आजच्या धावपळीच्या जगात बिघडलेली दिनचर्या आणि खाण्याच्या चुकीच्या सवयींचा आपल्या आरोग्यावर थेट परिणाम होतो. या समस्यांपैकी एक म्हणजे फॅटी लिव्हर, जी आता वेगाने वाढत आहे. फॅटी लिव्हर ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये यकृताच्या पेशींमध्ये जास्त चरबी जमा होते. ज्यामुळे यकृत म्हणजेच लिव्हरचे कार्य प्रभावित होते. या समस्येचे मुख्य कारण म्हणजे आपला खराब आहार, ज्यामध्ये फास्ट फूड, तळलेले पदार्थ आणि जास्त साखरेचे सेवन समाविष्ट आहे.

तसेच शारीरिक हालचालींचा अभाव, वाढता लठ्ठपणा आणि जास्त प्रमाणात मद्यपान हे देखील फॅटी लिव्हरला कारणीभूत ठरतात. फॅटी लिव्हर संतुलित आहार आणि नियमित व्यायामासोबत कमी करता येऊ शकते. आज आपण अशा काही बियां पाहूया ज्या फॅटी लिव्हरची समस्या कमी करण्यास मदत करू शकतात

खरबूजाच्या बिया-

खरबूजाच्या बियांमध्ये प्रथिने, निरोगी फॅट्स आणि लोह असते. जे यकृताचे पोषण करण्यास आणि नुकसान कमी करण्यास मदत करते. या बिया यकृताच्या पेशी पुन्हा तयार करण्यास आणि फॅटी लिव्हर नियंत्रित करण्यास मदत करतात.

जवसाच्या बिया-

जवसाच्या बियांमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि फायबर असतात. जे यकृतासाठी अत्यंत फायदेशीर असतात. ते यकृतामध्ये चरबी जमा होण्यास प्रतिबंध करतात आणि फॅटी लिव्हर रोगामुळे होणारी जळजळ आणि सूज कमी करतात.

भोपळ्याच्या बिया-

भोपळ्याच्या बियांमध्ये झिंक आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते. जे यकृताचे कार्य सुधारते. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि निरोगी फॅट्स यकृताची जळजळ कमी करण्यास मदत करतात. तज्ज्ञांच्या मते एका अहवालानुसार, पुरेशा प्रमाणात झिंकचे सेवन फॅटी लिव्हरला रोखण्यास मदत करू शकते.

सूर्यफुलाच्या बिया-

सूर्यफुलाच्या बियांमध्ये व्हिटॅमिन ई भरपूर प्रमाणात असते. जो एक शक्तिशाली अँटीऑक्सिडंट आहे. ते यकृताला ऑक्सिडेटिव्ह तणावापासून वाचवण्यास आणि त्याच्या पेशींचे संरक्षण करण्यास मदत करते.

# कोणती फळे खाल्ल्याने पोटफुगी आणि अपचनाचा त्रास होतो?

वजन कमी करण्यापासून ते शरीर डिटॉक्स करण्यापर्यंत सर्व गोष्टींसाठी फळे फायदेशीर मानली जातात. त्यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि आवश्यक खनिजे असतात. जी निरोगी शरीरासाठी आवश्यक असतात. काही लोक नाश्त्यात फक्त फळे खातात. काही लोक असे आहेत ज्यांना फळे खाल्ल्यानंतर पचनाच्या समस्या येतात.

अशा परिस्थितीत, काही फळे खाल्ल्यानंतर त्यांना ऍसिडिटी आणि पोटफुगीचा त्रास होतो. फळांच्या चुकीच्या सेवनामुळेसुद्धा असे होऊ शकते. आयुर्वेद आणि आतड्यांचे आरोग्य तज्ज्ञ डॉ. डिंपल यांनी इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे.ज्यामध्ये या फळांबद्दल आणि ते खाण्याच्या योग्य पद्धतीबद्दल माहिती दिली आहे. चला या फळांबद्दल जाणून घेऊया

**खरबूज-**

खरबूज खाल्ल्यानंतर काही लोकांना पचनाच्या समस्या येऊ शकतात. त्यात नैसर्गिकरित्या फ्रुक्टोज असते. ज्यामुळे काही लोकांमध्ये पचनक्रिया मंदावते. त्यामुळे अतिसार, आम्लता किंवा अपचन होऊ शकते. त्यामुळे काही लोकांमध्ये पोटफुगी देखील होऊ शकते. म्हणून, जेव्हाही तुम्ही खरबूज खाता तेव्हा त्यात थोडी काळी मिरी घालून खा.

**सफरचंद आणि ब्लूबेरी-**

सफरचंद आणि ब्लूबेरीमध्ये नैसर्गिकरित्या सॉर्बिटॉल असते. ही एक प्रकारची नैसर्गिक साखर आहे जी अनेक फळांमध्ये आढळते. काही लोक ही नैसर्गिक साखर पचवू शकत नाहीत, ज्यामुळे गॅस आणि पोटफुगीसारख्या समस्या उद्भवतात. सॉर्बिटॉलच्या जास्त प्रमाणात सेवन केल्याने मुलांमध्ये अतिसार देखील होऊ शकतो. त्यांचे योग्य सेवन करण्यासाठी, त्यांना थोडे गरम करा आणि सकाळी



खा. तसेच, त्यांना दालचिनी, लवंग आणि काळी मिरी घालून पाण्यात शिजवा.त्यामुळे पोटफुगी होणार नाही.

**टरबूज-**

टरबूज जास्त प्रमाणात सेवन केल्याने अनेक लोकांमध्ये पचनाच्या समस्या देखील उद्भवू शकतात. फ्रुक्टोजची ऍलर्जी असलेल्यांना ते खाणे टाळावे. त्यांनी खाण्यापूर्वी त्यावर चाट मसाला किंवा काळी मिरी देखील शिंपडावी.

**पीच-**

पीचमध्ये पॉलिओल्स नावाचा नैसर्गिकरित्या आढळणारा गोड पदार्थ असतो. हा घटक अनेक लोकांमध्ये पचण्यास कठीण असतो. ज्यामुळे पीच खाल्ल्यानंतर पचनाच्या समस्या उद्भवतात. ते आतड्यांतील बॅक्टेरियांना अडथळा आणून आतड्यांना नुकसान पोहोचवू शकते. ते खाण्यासाठी, पीच पाण्यात काळी मिरी, दालचिनी, वेलची आणि लवंग घालून उकळा.आणि नंतर सेवन करा.

## हिवाळ्यात ओठ का फुटतात? कोणत्या व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे उद्भवते ही समस्या

हिवाळ्यात त्वचा कोरडी होणे सामान्य आहे. आपल्यापैकी बहुतांश जणांना या समस्येचा सामना करावा लागतो. थंडीच्या काळात ओठ फाटणे ही अनेकांसाठी सर्वात मोठी समस्या आहे. मात्र, आरोग्य तज्ञांचं म्हणणं आहे की, हिवाळ्यात वारंवार ओठ फाटणारे किंवा कोरडे ओठ हे केवळ हवामानामुळे नसून शरीरात पोषक तत्वांच्या कमतरतेमुळे देखील होऊ शकतात. प्रथिने आणि कार्बोहायड्रेट्सप्रमाणेच, चांगल्या आरोग्यासाठी जीवनसत्त्वे आवश्यक असतात. जेव्हा आपल्या शरीरात त्यांची कमतरता भासते तेव्हा अशा अनेक आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते. तज्ञांचं म्हणणं आहे की, हिवाळ्यात व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेमुळे अनेकांना ओठ फाटणे किंवा कोरडे पडणे या समस्यांचा सामना करावा लागतो.

ओठ फाटण्याचे कारण काय?

उत्तराखंडमधील त्वचारोगतज्ञ डॉ. आशा सकलानी म्हणतात की, जर आपल्या शरीरात आवश्यकतेपेक्षा कमी व्हिटॅमिन बी१२ असेल तर हिवाळ्यात या व्हिटॅमिनच्या कमतरतेमुळे ओठ फाटू शकतात आणि कोरडे होऊ शकतात. व्हिटॅमिन बी१२ च्या कमतरतेमुळे ओठ फाटू शकतात आणि त्वचा कोरडी होऊ शकते. व्हिटॅमिन बी१२ शरीरासाठी अत्यंत महत्वाचे आहे. ते लाल रक्तपेशींच्या निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. त्याच्या कमतरतेमुळे अशक्तपणा होतो. शिवाय, या कमतरतेमुळे सुन्नपणा, मुंग्या येणे आणि स्मरणशक्तीच्या समस्या देखील उद्भवू शकतात. ते शरीरात डीएनएच्या सेंषणास देखील मदत करते.

हिवाळ्यात ओठ फाटण्याची समस्या वाढण्याचे कारण: डॉ. आशा सकलानी स्पष्ट करतात की, ओठांवरची त्वचा अत्यंत पातळ आणि संवेदनशील असते. शिवाय, आपले ओठ शरीराच्या इतर भागांपेक्षा हवामान आणि पर्यावरणीय घटकांच्या संपर्कात जास्त येतात. ओठ फाटण्याची अनेक कारणे असली तरी, हिवाळ्यात ओठ फाटण्याची आणि फ्लॅकी होण्याची समस्या विशेषत: सर्व वयोगटातील लोकांमध्ये सामान्य होते.

खरं तर, हिवाळ्यात, वातावरणातील आर्द्रता कमी होते, ज्यामुळे आपल्या ओठांवर परिणाम होतो, ज्यामुळे ते कोरडे आणि चपळ होतात. शिवाय, या ऋतूत लोक कमी पाणी पितात, ज्यामुळे डिहायड्रेशन होऊ शकते, ज्यामुळे ही समस्या आणखी वाढते. शिवाय, लोक ओलावा टिकवून ठेवण्यासाठी किंवा अस्वस्थता टाळण्यासाठी त्यांचे कोरडे ओठ चाटतात. तथापि, लाळ ओठांवरची त्वचाच कोरडी करते, ज्यामुळे ही समस्या आणखी वाढते.

व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेवर मात करण्यासाठी काय खावे?

व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेवर मात करण्यासाठी, तुम्ही तुमच्या आहारात काही गोष्टींचा समावेश करू शकता, जसे की...

मासे: व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेवर मात करण्यासाठी, तुम्ही तुमच्या आहारात सॅल्मन, ट्यूना आणि सार्डिनचा समावेश करू शकता.

शंख मासे: तुम्ही तुमच्या आहारात क्लॅम आणि ऑयस्टर सारख्या गोष्टींचा देखील समावेश करू शकता.

अंडी: व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दूर करण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारात अंडी देखील समाविष्ट करू शकता.

दुग्धजन्य पदार्थ: दूध, दही आणि पाणी यांसारख्या दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करून व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता देखील दूर केली जाऊ शकते

## व्हॉट्सॲपवर आलेला फोटो दिसत नाही फोनच्या गॅलरीत त्वरित करा हे काम

अनेक वेळा असे घडते की व्हॉट्सॲपवर फोटो येतात, पण ते गॅलरीत दाखवले जात नाहीत. अशा परिस्थितीत खूप त्रास होतो, ज्यामुळे अनेक महत्त्वाची कामे करता येत नाहीत. पण आता तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. आता तुम्ही गॅलरीत व्हॉट्सॲपचे फोटो सहज पाहू शकणार आहात. यासाठी तुम्हाला फक्त ही ट्रिक फॉलो करावी लागेल.

बरं, ही समस्या बहुतेक आयफोन वापरकर्त्यांना भेडसावत आहे. जेव्हा जेव्हा फोनचे स्टोरेज भरलेले असते, तेव्हा व्हॉट्सॲपचे फोटो डाउनलोड होत नाहीत. अशा परिस्थितीत वापरकर्त्यांना असे वाटते की फोन खराब झाला आहे किंवा फोटो योग्य नाही, त्यांना पाठवणाऱ्याला पुन्हा फोटो पाठवण्यास सांगावे लागते.

आयफोन वापरकर्ते स्टोरेजबद्दल सर्वाधिक चिंतेत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यापैकी एक म्हणजे इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट केलेले फोटो गॅलरीत दाखवले जात नाहीत. कॅमेऱ्यातील फोटो गॅलरीत राहतात, पण व्हॉट्सॲपवर आलेले फोटो दाखवले जात नाहीत. यासाठी तुम्हाला फोटो डाउनलोड करावा लागेल. यानंतर तुम्हाला त्या फोटोवर क्लिक करावे लागेल.

येथे तुम्हाला पहिल्या पर्यायामध्ये सेव्ह आयकॉन दिसेल. या चिन्हावर क्लिक करा. आता तुमचा फोटो गॅलरीत दाखवला जाईल. तुम्हाला प्रत्येक फोटोसाठी हे करावे लागणार नाही. जे फोटो तुम्हाला दाखवले नाहीत, ते मॅन्युअली सेव्ह करावे लागतील. याशिवाय, व्हॉट्सॲप सेटिंग्जमध्ये जा आणि तपासा की मीडिया फाइल डाउनलोड फीचर सक्षम आहे की नाही ते पाहा, सक्षम नसेल तर ते चालू करा. तुम्ही तुमच्या फोनमध्ये ऑटो डाउनलोड फीचर देखील सक्षम करू शकता. हे फीचर अँड्रॉईड आणि आयफोन या दोन्ही स्मार्टफोनमध्ये उपलब्ध आहे. या फीचरनंतर तुम्हाला पुन्हा पुन्हा फोटो आणि व्हिडिओ डाउनलोड करावे लागणार नाहीत. तुमचे फोटो आणि व्हिडिओ आपोआप डाउनलोड होत राहतील.

## चमकदार त्वचेसाठी दररोज खा आंबट फळे, जाणून घ्या उत्तम स्त्रोत

बदलेली जीवनशैली आणि केमिकलयुक्त प्रॉड्क्टसच्या जास्त वापरामुळे, लोकांना त्वचेशी संबंधित काही ना काही समस्यांना तोंड द्यावे लागते. निरोगी आणि चमकदार त्वचेसाठी, लोकांना अनेकदा धान्य, हंगामी फळे आणि भाज्या यासारखे पौष्टिक पदार्थ खाण्याचा सल्ला दिला जातो. आपण खात असलेल्या अन्नाचा त्वचेवरही परिणाम होतो. अशा परिस्थितीत, चमकदार त्वचेसाठी, निरोगी आहार घेणे आणि वाईट सवयी सोडून देणे महत्वाचे आहे. त्वचा तज्ञ चमकदार त्वचेसाठी आंबट पदार्थ खाण्याचा सल्ला देतात. पाआज आपण जाणून घेऊया की निरोगी आणि चमकदार त्वचेसाठी आंबट पदार्थ खाणे का फायदेशीर आहेत..

**आंबट फळे खाण्याचे फायदे-**

**आंबट फळे** व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात. ते खाल्ल्याने कोलेजनचे उत्पादन वाढते आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ज्यामुळे त्वचा चमकदार होते. तसेच आंबट फळे त्वचेचा रंग सुधारण्यास, पिंपल्स आणि सुरकुत्या यासारख्या त्वचेच्या समस्या टाळण्यास मदत करतात.

**अननस –** अननसमध्ये व्हिटॅमिन सी, अँटीऑक्सिडंट्स आणि ब्रोमेलेन असते. जे त्वचेला उजळ बनवते. आणि मेलास्मा कमी करण्यास मदत करते. ते खाल्ल्याने त्वचेतील कोलेजनची पातळी वाढते. फ्री रॅडिकल्सपासून संरक्षण होते, जळजळ कमी होते, डाग कमी होतात, वृद्धत्व रोखते आणि त्वचा चमकते.

**आवळा –** आवळ्यासारख्या आंबट फळांमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात. त्यांचा आहारात समावेश केल्याने शरीरात कोलेजन उत्पादन वाढते. जे डाग आणि मुरुम यासारख्या त्वचेच्या समस्या दूर करण्यास मदत करते आणि त्वचेचा रंग सुधारते.

**संत्री** –संत्री त्वचेसाठी फायदेशीर आहेत. त्यात व्हिटॅमिन सीचे प्रमाण चांगले असते, जे त्वचेमध्ये कोलेजनचे उत्पादन वाढवते. म्हणून, आहारात त्याचा समावेश केल्याने त्वचेचा रंग सुधारण्यास, त्वचेला हायड्रेट करण्यास आणि डागांसारख्या त्वचेच्या समस्या दूर करण्यास मदत होते.

**किवी –** आहारात किवीचा समावेश केल्याने नैसर्गिकरित्या त्वचेचा रंग सुधारण्यास आणि त्वचेच्या समस्या दूर करण्यास मदत होते. किवी फळांमध्ये असलेले व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेची लवचिकता सुधारण्यास मदत करतात, जे सुरकुत्या दूर करतात.

## उपदेशकथा:तन्मयता

परलोकवासी प्रसिद्ध चित्रकार आबालाल रहमान यांची ही गोष्ट. रंगांच्या दुनियेत दंग झालेला हा कलावंत बाजारात गेला नि घेऊन आला दोन रसरशीत कृष्णाकाठची वांगी, तजेलदार भोपळी मिरच्या, शताक्ष सीताफळ नि हिरवीगार कोथिंबीर जुडी. त्यावेळी गोविंदराव टेंब्यांनी विचारलं, ङ्गकाय, बाजार आटोपला वाटतं?फ चित्रकार उत्तरले, ङ्गअहो, ही भाजी नव्हे चित्रं आहेत. ही वांगी बेटी फार त्रास देणार बघा.

वा, वा काय पण रंग आहे.फ टेंबे म्हणाले, ङ्गवांगी खाल्ली तरीही त्रास देतातच !फ आबालाल यावर उत्तरले, अरे, खुदानं वांगी निर्माण केली ती मुळी चित्र बहारीनं रंगवता यावं म्हणून ! खाण्यासाठी नव्हे.फ इतके ते सृष्टीतील रंगवृष्टीशी तन्मय झालेले अवलिया चित्रकार होते.

प्रतिभावंत चित्रकार मायकेल एंजेलोने म्हटले आहे की, ज्याला चित्रकार व्हायचं त्याला अवतीभवती सर्वत्र चित्रं दिसली पाहिजेत. जमिनीवर, झाडाझुडपांवर, आभाळात सगळीकडे निसर्गाची तुलिका अजब रेखाटनं करीत असते.

## महिलांच्या निरोगी गर्भासाठी...



गर्भधारणेदरम्यान निरोगी गर्भासाठी संतुलित आहार (प्रथिने, फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, निरोगी चरबी), नियमित व्यायाम, पुरेसा आराम आणि ताण कमी करणे आवश्यक आहे; कच्चे मासे, अल्कोहोल आणि न पाश्चराइज्ड उत्पादने टाळा, डॉक्टरांच्या सल्ल्याचे पालन करा आणि फॉलिक सिड, लोहयुक्त पदार्थांचा आहारात समावेश करा, ज्यामुळे बाळाची उत्तम वाढ होण्यास मदत होते.

गर्भधारणेपूर्वी आणि गर्भधारणेदरम्यान घ्यावयाची काळजी:

संतुलित आहार: प्रथिने (अंडी, चिकन, मासे, कडधान्ये), फळे, हिरव्या पालेभाज्या, संपूर्ण धान्य आणि ॲव्होकॅडो, ऑलिव्हसारख्या निरोगी चरबींचा आहारात समावेश करा.आवश्यक पोषक तत्वे:प्रथिने: बाळाच्या वाढीसाठी आवश्यक. फॉलिक सिड: हिरव्या पालेभाज्या, लिंबूवर्गीय फळे, बीन्स.

लोह (खीप): लाल मांस, मासे, बीन्स, मसूर (लाल रक्तपेशींसाठी).टाळायचे पदार्थ: कच्ची मासे, उच्च पारा असलेले मासे, न पाश्चराइज्ड डेअरी उत्पादने आणि अल्कोहोल टाळा. व्यायाम आणि विश्रांती: हलका व्यायाम आणि पुरेशी विश्रांती घ्या. तणाव व्यवस्थापन: ताण कमी करण्याचा प्रयत्न करा.

# प्रत्येकांच्या जीवनाचे सार – चार गोष्टी



जगातल्या प्रत्येक अडचणीची उकल शक्य आहे. मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे सातत्य, निष्ठा व प्रयत्न करण्याची क्षमता असेल तर त्यासाठी सर्व सोपे आहे. जीवनाला निरुपयोगातून उपयोगी बनवण्यासाठी अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्यांचा जीवनात समावेश केल्याने अडचणींचे समाधान होऊ शकते. या चार गोष्टींना जीवनाचे सार किंवा आधार सुद्धा म्हटले जाऊ शकते. सर्व प्रकारच्या विकारांचा त्याग, मिथ्यत्व सोडून साधेपणा ग्रहण करणे आहे, बंधने झुगारुन साहस व जीवनात अध्यात्माचा समावेश केला तर मनुष्याचे निरुपयोगी जीवन उपयोगी बनेल. त्याच्या जीवनात असंतोषाचा नाश होईल. त्याबदल्यात त्याच्या जीवनात आनंद, उत्साह, शांतता व समाधानाची वृद्धी होईल.

विकार मानवी जीवनातील सर्वात मोठा अडसर आहे. जो मानवास फक्त विकृती देतो तसेच उदारता, दान, दया, प्रेम या प्रवृत्तींना वंचित करतो. म्हणून त्याच्या भौतिक इच्छा इतक्या बळावतात की, संग्रह करणे मग ते योग्य-अयोग्य, कर्तव्य-अकर्तव्य, नातेवाईक-त्रयस्त, शोषण-पोषण याचा अजिबात विचार करत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, मर्यादा व धोरणे क्षुल्लक वाटू लागतात. अशाप्रकारे विकारांनी पिडीत मनुष्याच्या जीवनात शोक-संताप व अशांतता, असंतोषाशिवाय कुणाला आनंदाची संधी मिळू शकते? विकृती मनुष्याचा फार मोठा दोष आहे, याचा तात्काळ त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मनुष्याचे दोन दागिने मानले गेले आहेत. उदारतेचा गुण आपल्यातील इतर गुण त्यागण्यास प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्येपेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह धोरण व आदर्शा व्यतिरिक्त करत नाही. उदारता पुरुष मोक्षासाठी अंगीकारतो. उदार पुरुष धोरणाने मिळवलेल्या धन-धान्याने सुखी व समाधानी राहतो. अशा लोकांची प्रत्येक अडचण आ-पोआप सुटत राहते.

# तरच विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग सापडेल



नुकतेच इयत्ता दहावी-बारावीचे निकाल लागले. या वर्षी अनेक शाळांचे शंभर टक्के निकाल लागले आहेत. कोरोनानंतर खऱ्या अर्थाने यंदाची दहावी-बारावीची जी परीक्षा झाली, ती परीक्षा विद्यार्थांसाठी मोठे आव्हान होते. कारण त्यातून सावरत असताना अभ्यासाचे टेन्शन प्रत्येक विद्यार्थ्यावर होते. असे असताना भरपूर विद्यार्थी उत्तीर्ण झाले. काहींना अपयशही आले असेल. अपयश आले असले तरी खचून ज्याण्याचे काही कारण नाही. जीवनात यश आणि अपयश येतच असते. यश आले तरी पुढे जायचे आणि अपयश आले तरी पुढे जायचे, अशी खूणगाठ मनाशी बांधली पाहिजे. उलट अपयशातून बरेच काही शिकता येते, हे ध्यानात घेतले पाहिजे. त्यामुळे जिद्दीने पुढे जावे, असाच सल्ला द्यावासा वाटतो. खरे तर दहावी-बारावी परीक्षेचा टप्पा हा महत्त्व- पूर्ण असतो. जीवन बदलाचा हा टप्पा असे त्याचे वर्णन केले तरी ते योग्य आहे. कारण या टप्प्यातून आपण पुढचे अभासक्रम निवडत असतो. शिवाय प्रत्येकाच्या आवडी-निवडी वेगवेगळ्या असतात. कुणाला कला, कुणाला वाणिज्य तर कुणाला विज्ञान विषयात गोडी, रुची असते. विषय कोणतेही असो आपण त्या त्या विषयाला कसा न्याय देतो, हे आपल्यावर अवलंबून आहे. असो. अनेकांनी या परीक्षेनंतर आपापल्या आवडीचे विषय निवडले असतीलच. या दोन्ही परीक्षा पास झाल्यानंतर विद्यार्थी आणि पालकांची संभ्रमावस्था निर्माण होते. नेमका काय विषय निवडायचा जेणेकरून आपणास पुढे जाता येईल, असा प्रत्येकाच्या मनात विचार आलेला असतो. अशा वेळी मनाची घालमेल होते; परंतु शांतपणे विचार केला पाहिजे. वर म्हटल्याप्रमाणे विषय कोणताही असो आपण त्याला कसा न्याय्य देतो, हे आपल्यावर अवलंबून असते. म्हणजे झोकून देऊन, जिद्द, चिकाटी आणि मेहनत या गोष्टी लक्षात घेऊन पुढे गेले पाहिजे. आपली आवड कशात आहे, हे आधी ठरवले पाहिजे. पालकांनीही अमूकच विषय आपल्या पाल्ल्याने घेतला पाहिजे, असा आग्रह धरता कामा नये, तर त्याचा कल काय आहे, याची त्याला निवड करू दिली पाहिजे. म्हणजेच त्याच्यावर आपला विचार लादता कामा नये. पालक म्हणून त्याचा सांभाळ करणे, शिक्षण देणे, त्याच्या योग्य गरजा पूर्ण करणे एवढेच पालकांच्या हातात असते. शेवटी त्याला त्याचे पुढे जीवन जगवायाचे असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनीच अधिक सखोल आणि सकारात्मक विचार करणे आवश्यक आहे. कारण या टप्प्यामध्ये आपण योग्य निर्णय घेतला नाही, तर आपणावर भरकटण्याची पाळी आल्याशिवाय राहणार नाही, म्हणून सजग झाले पाहिजे. अर्थात सगळयांनाच परिस्थिती अनुकूल असतेच असे नाही. अनेकांना प्रतिकूल परिस्थितीतून मार्गक्रमण करावे लागते. कुणाचे आई-वडील शेतात काम करतात, कुणी अल्प पगारावर नोकरी करून घर चालवत असतात. कुणी रिक्षा चालवून, कुणाची आई धुणी-भांडी करीत असेल, तर कुणी काय, कुणी काय आपला कामधंदा करून मुलाबाळांना शिकवत असतात. अशाही परिस्थितीत मुले-मुली जाणीव ठेवून शिक्षण घेतात आणि पुढे जातात. परीक्षांचे निकाल लागल्यानंतर वर्तमानपत्रांतून पुढे ज्या काही यशकथा प्रसिद्ध होतात, त्यावरून कोण कसा पास झाला, याचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहाते आणि ज्याने विचार केला नाही तोही गांभीर्याने विचार करू लागतो. यासाठीच योग्य विचार करण्याची गरज आहे. नुसतेच विचार करून चालणार नाही, तर त्याला कृतीचीही जोड द्यावी लागेल. म्हणून अशा वेळी तज्ज्ञांचा सल्ला महत्त्वाचा ठरतो. आपले करिअर आपण कसे घडवू शकतो, यासाठी विद्यार्थी आणि पालकांचे समुपदेशन करणे आवश्यक असते. सगळ्यात महत्त्वाची आहे ती आवड-निवड. याची आपल्या आवडीनुसार, कुवतीनुसार अभ्यासक्रम निवडला की त्यात गोडी निर्माण होते आणि त्याला न्याय देता येतो. नेमके हेच होत नाही. त्यामुळे मुलांना अपयश येते, नैराश्य येते आणि मग त्यातून नको ते विचार डोक्यात येतात. बरे ज्यांनी परीक्षेत भरपूर अगदी नव्वद टक्क्यांपेक्षा अधिक मार्क्स मिळवले, पुढे त्यांचे काय होते हेही माहीत पडत नाही. मार्क्स कमी मिळाले, जास्त मिळाले म्हणून मागेच राहील किंवा पुढे जाईल हेही सांगता येत नाही. कमी गुण मिळवणारे पुढे गेलेल्यांमध्ये अनेकजण आहेत. तर जास्त मार्क्स मिळवणारे मागे पडले, असेही होते. म्हणून आवडीनुसार अभ्यासक्रम निवडून योग्य मार्गदर्शन घेऊन पुढे जाणे हाच जीवनात यशस्वी होण्याचा मार्ग आहे.

विद्यार्थ्यांना दहावीनंतर मोलाचे मार्गदर्शन ठरावे या दृष्टिकोनातून करिअर गाईडच्या माध्यमातून मार्गदर्शन नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमाचे कौतुक करताना विद्यार्थ्यांना हे मार्गदर्शन बोधामृत असल्याचे गौरवोद्गार पराग विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी बाळकृष्ण बनेशेठ यांनी या कार्यक्रमादरम्यान काढले असल्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाची किती गरज आहे, हे प्रकर्षाने जाणवते. अशा प्रकारचा पहिला कार्यक्रम प्रहारफ्च्या मुंबई कार्यालयात नुकताच झाला. यामध्ये काही विद्यार्थी, पालक आणि त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशकांची उपस्थिती होती, तर दुसरा कार्यक्रम भांडुपच्या पराग विद्यालयात घेण्यात आला. यावेळी करिअर मार्गदर्शक सचिन सिंग यांनीही याबाबतच्या गरजेवर भर दिला. यशस्वी करिअरसाठी आत्मविश्वास महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने तो निर्माण करा, असा मोलाचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना या उपक्रमाद्वारे मार्गदर्शन करताना दिला. परीक्षेत अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी करिअरमध्ये यशस्वी होतातच असे नाही, अशावेळी पालकांनी मुलांशी संवाद साधला तरच योग्य पद्धतीने पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. या दृष्टीने विद्यार्थ्यांनी विचार केल्यास त्यांना निश्चितच चांगला मार्ग सापडेल आणि ते आपले जीवन समृद्ध करू शकतील.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा




पालकाची भाजी अशक्तपणा घालवते. त्यामुळे त्याचा आहारात समावेश करावा. यात कॅल्शियम, अ, ई आणि बी ९ जीवसत्त्व आणि बिटा केरॉटिन असतं. अर्धा कप उकळलेल्या पालकात ३.२ मिलिग्रॅम लोह मिळतं.हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी ड जीवनसत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतं. अलीकडच्या काळात स्नायूंचं दुखणं ही तरुणाईसमोरची मोठी समस्या ठरली आहे. त्याचं कारण म्हणजे ड जीवनसत्त्वाची कमतरता. शहरी भागात राहणारे ८० ते ९० टक्के लोक ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या त्रासांनी ग्रस्त आहेत. ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेनं हार्मोनमध्ये कमी निर्माण होते. त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. उन्हाचं प्रमाण कमी मिळालं, तरच ड जीवनसत्त्वाची कमतरता निर्माण होते. या जीवनसत्त्वाचा डोस नियमितपणे मिळाला, तर हाडं आणि स्नायूंचं दुखणं कमी होतं.

## २ Joke — विनोद




अजय खेळून झाल्यावर विजयला म्हणाला, अरे माझी क्रिकेटची कॅप कुठे आहे? विजय म्हणाला, अरे, ती तर तुझ्या डोक्यावरच आहे तेव्हा अजय म्हणाला, अरे बरे झाले मला सांगितलेस ते नाही तर मी तिच्याशिवाय घरी गेलो असतो.

## ३ Message — संदेश




Latest New santa banta jokes 2019

SANTA- Aaj kal zyada bachche judwa kyo paida hote h?

BANTA- Desh me itna terrorist attacks badh gaya h ke bachche akele aane se darte hai yaar....

## ४ Thought — सुविचार

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.

**- स्वामी विवेकानंद**




**संस्कृत सुभाषित**

**कस्य दोषः कुले नास्ति, व्याधिना कोन पीडितः। केन न व्यसनं प्राप्तं, श्रियः कस्य निरन्तरा ।।**

**अर्थ** - दोष कोणत्या कुळात नसतो? व्याधीमुळे कोणाला त्रास होत नाही? संकटे कोणावर येत नाहीत? आणि कोणाची संपत्ती टिकून राहते? सर्वांनाच या सर्वांशी तोंड द्यावे लागते.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत




## थोडक्यात/ संक्षिप्त

### नॅशनल रोलर स्केटींग चॅम्पियनशिपमध्ये नवी मुंबईचे खेळाडू चमकले; पहिल्या दिवशी ६ पदकं जिंकत गाजवला दिवस

पुणे –पुण्यात सुरु असलेल्या ीउध्ध अर्थात रुलर गेम ऑफ इंडियाच्या वतीने सुरू असलेल्या नॅशनल रोलर स्केटींग चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये नवी मुंबईतील टीम एक्स्ट्रीमच्या खेळाडूंनी लक्षणीय कामगिरी करत पहिल्या दिवशी तब्बल ६ पदकांवर आपले नाव कोरले. कोणत्या खेळाडूंनी जिंकली पदकं : पुणे येथील एलएक्सटी राहुल राणे स्केटिंग बॅण्ड ट्रॅकवर १७ आणि १८ जानेवारी २०२६ रोजी १३वी नॅशनल रोलर स्केटींग चॅम्पियनशिप स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत अनन्या माळी (२ रौप्यपदक) स्वरूप सोनवणे (१ रौप्य आणि १ कांस्यपदक) आणि पृथ्वी भावना राजेश (२ कांस्यपदक) यांनी उल्लेखनीय कामागिरी केली. प्रत्येकाने महाराष्ट्रासाठी दुहेरी पथकांची कमाई केली आहे. करण सरदार यांनी या सर्व खेळाडूंना मार्गदर्शन केले आहे. करण सरदार हे स्वत: राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबईमध्ये टीम एक्स्ट्रीम या क्लब मध्ये १०० पेक्षा अधिक खेळाडू प्रशिक्षण घेत आहेत. कसा खेळला जातो रोलर स्केटींग : रोलर स्पीड स्केटिंग इव्हेंट्स सहसा आउटडोअर आयोजित केले जातात, जरी कधीकधी बंक भिंतींवर किंवा बंद रस्त्याच्या सर्किटवर घराच्या आत आयोजित केले जातात. खेळाडूंनी परिधान केलेल्या इनलाइन स्केट्सवर जास्तीत जास्त पाच चाकांना परवानगी आहे आणि चाके ११० मिमी व्यासापेक्षा जास्त असू शकत नाहीत.

### कोहली असता तर त्याच्या बापानेही एक रन काढून....स्टीव्ह स्मिथने बाबर आझमची अब्रू वेशीवर टांगली

मुंबई–बीबीएलमधील एका सामन्यात बाबर आझमसोबत घडलेल्या घटनेवरून मोठा वाद पेटला असून, यावर पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू बासित अली यांनी परखड प्रतिक्रिया दिली आहे. सिडनी सिक्सर्स आणि सिडनी थंडर यांच्यातील सामन्यात ही घटना घडली. बाबर आझम सुमारे ४० धावांवर फलंदाजी करत असताना ११व्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर त्याला सिंगल घ्यायचा होता. मात्र, नॉन–स्ट्रायकर एंडवर उभ्या असलेल्या स्टीव्ह स्मिथने सिंगल घेण्यास स्पष्ट नकार दिला. त्यामुळे बाबर नाराज झाला. यानंतर स्मिथने पुढच्याच षटकात तुफानी फलंदाजी करत तब्बल ३२ धावा ठोकल्या. दुसरीकडे, बाबर १३व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर बाद झाला. बाद झाल्यानंतर तो नाराज होता, त्याने त्यावेळी सीमारेषेवर बॅट आपटली, ज्यामुळे हा वाद आणखी चिघळला. या घटनेनंतर पाकिस्तानचा माजी यष्टीरक्षक कामरान अकमल यांनी स्मिथच्या वागणुकीवर टीका केली. यूट्यूबवर प्रतिक्रिया देताना अकमल म्हणाले, ''स्मिथने ज्या हावभावात बाबरला सिंगल घेऊ दिला नाही, ते योग्य नव्हते. ''अकमल पुढे म्हणाले, ''जर सिडनी सिक्सर्स बाबरवर समाधानी नसतील, तर त्याला संघातून बाहेर काढा. पण अशा प्रकारे त्याचा अपमान करू नका. त्याला बाहेर बसवा.'' मात्र, याच्या उलट भूमिका घेत पाकिस्तानचे आणखी एक माजी क्रिकेटपटू बासित अली यांनी संपूर्ण घटनेला बाबरलाच जबाबदार धरले.

### प्रेक्षकांची स्टेडियममध्ये एन्ट्रीही झाली नाही, तोवर मॅचमध्ये तीन मोठे ड्रामा; इंदौरमध्ये काय घडलं?

मुंबई –इंदूरच्या होळकर क्रिकेट स्टेडियमवर आज भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील ३ मॅचेसच्या सीरिजचा शेवटचा आणि निर्णायक सामना रंगत आहे. भारतीय कर्णधार शुभमन गिलने या महत्त्वाच्या मॅचमध्ये टॉस जिंकून प्रथम बॉलिंग करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. सीरिज सध्या १–१ ने बरोबरीत असल्याने हा सामना दोन्ही संघांसाठी विजेतेपदाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. अशातच पहिल्या सहा मिनिटात मॅच फिरली अन् तीन मोठे ड्रामा पहायला मिळाले.

रविंद्र जडेजाने कॅच सोडला–टीम इंडियाचा बॉलर प्रसिद्ध कृष्णाला आज विश्रांती देण्यात आली असून त्याच्या जागी अर्शदीप सिंगचा टीममध्ये समावेश करण्यात आला आहे. अशातच पहिल्या ओव्हरच्या तिसऱ्याच बॉलवर अर्शदीप सिंगने हेन्री निकोल्सचा कॅच उडवला पण पॉईटला थांबलेल्या रविंद्र जडेजाने कॅच सोडला. तर चौथ्याच बॉलवर अर्शदीपने हेन्री निकोल्सच्या दांड्या उडवल्या. पहिल्याच ओव्हरमध्ये टीम इंडियाने दबदबा मिळवला. त्यानंतर दुसऱ्या ओव्हरमध्ये देखील मॅच फिरली.

टीम इंडियाला दुसरी विकेट मिळाली

अर्शदीपनंतर दुसऱ्या ओव्हरमध्ये नव्या बॉलने हर्षिदने देखील जादू दाखवली.

# न्यूझीलंडने इंदोरमध्ये उधळला विजयाचा गुलाल!

## कोहलीची झुंजार खेळी व्यर्थ; भारताचा ४१ धावांनी पराभव

**इंदोर (वृत्तसंस्था) :** न्यूझीलंड संघाने भारताचा तिसऱ्या वन–डे सामन्यात ४१ धावांनी पराभव करत मालिका आपल्या नावे केली आहे. न्यूझीलंड संघाने अखेरचे दोन्ही वनडे सामने जिंकत मालिका १–२ च्या फरकाने जिंकली आहे. न्यूझीलंड संघाने भारतात भारताविरूद्ध पहिला वन–डे मालिका विजय नोंदवला आहे. भारताच्या सिनियर संघासमोर न्यूझीलंडच्या ब संघाने उतरत दणदणीत मालिका विजय मिळवला आहे. यासह भारतासाठी हा मालिका पराभव जखम अधिक खोल करणारा आहे. न्यूझीलंडने दिलेल्या ३३८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरूवात खूपच खराब झाली. रोहित शर्मा ११ धावा तर शुभमन गिल २३ धावा करत बाद झाले. दरम्यान रोहित शर्मा ११ धावांवर बाद झाल्यानंतर विराट कोहली फलंदाजीला उतरला. सुरूवातीला गिल मैदानावर असेपर्यंत विराटने काही आक्रमक फटके खेळत झटपट धावा केल्या. तसेच श्रेयस अय्यर ३ धावा तर के.एल राहुलही १ धाव करत बाद झाला.दरम्यान विराट कोहलीचे शतक आणि हर्षित राणा व नितीश कुमार रेड्डी यांची अर्धशतकं व्यर्थ ठरली.भारताने नाणेफेक जिंकत न्यूझीलंड संघाला फलंदाजीसाठी पाचारण केले. न्यूझीलंड संघाकडून







डॅरिल मिचेल व ग्लेन फिलिप्स यांनी शतकं झळकावलीव संघाच्या मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. पहिल्याच षटकात अर्शदीप सिंगने हेन्री निकोल्सला शून्यावर बाद केले. तसेच दुसऱ्याच षटकाच्या पहिल्या चेंडूवर डेवॉन कॉनवेला हर्षित राणाने ५ धावांवर माघारी धाडले. पण नंतर डॅरिल मिशेल आणि विल यंग यांनी डाव सावरताना ५३ धावांची भागीदारी केली. पण खेळपट्टीवर स्थिरावलेल्या विल यंगला ४१ चेंडूत ३० धावांवर असताना १३ व्या षटकात हर्षित राणाने बाद केले. त्याचा अफलातून झेल रवींद्र जडेजाने घेतला.

मात्र यानंतर मिशेलने ग्लेन फिलिप्सला साथीला घेतले. या दोघांनी खराब चेंडूंचा समाचार घेत पाहाता पाहाता द्वीशतकी भागीदारी केली. या दोघांनीही शतके साजरी केली. मिशेलन ३६ व्या षटकात १०६ चेंडूत त्याचे शतक झळकावले. हे त्याचे नववे वनडे शतक आहे, तर भारताविरुद्धचे चौथे शतक आहे. याशिवाय चालू मालिकेतील सलग दुसरे शतक आहे. त्याच्यापाठोपाठ ४२ व्या षटकात फिलिप्सनेही ८३ चेंडूत शतक केले. पण शतकानंतर अखेर फिलिप्सला ४४ व्या षटकात अर्शदीप सिंगने बाद केले. त्याचा झेल यष्टीरक्षक के. एल राहुलने घेतला. त्याने ८८ चेंडूत ९ चौकार आणि ३ षटकारांसह १०६ धावांची खेळी केली. तो बाद झाल्याने त्याची मिशेल सोबतची २१९ धावांची भागीदारी तोडली. तो बाद झाल्यानंतर न्यूझीलंडच्या फलंदाजांनी आक्रमक खेळण्याच्या प्रयत्नात नियमित अंतराने विकेट्स गमावल्या. ४५ व्या षटकात मिशेलला मोहम्मद सिराजने बाद केल. मिशेलने १३१ चेंडूत १५ चौकार आणि ३ षटकारांसह १३७ धावा केल्या. त्यानंतर मिचेल हे यालाही कुलदीप यादवने २ धावांवर पायचीत केले. तर झाकरी फोक्सने ८ चेंडूत १० धावा केल्या.

४९ व्या षटकात ख्रिनस्टन क्लार्कही ११ धावांवर हर्षित राण्याच्या गोलंदाजीवर त्रिफळाची झाला. पण मायकल ब्रेसवेलने शेवटच्या दोन षटकात आक्रमक खेळताना १८ चेंडूत नाबाद २८ धावा केल्या. त्यामुळे न्यूझीलंडने ५० षटकात ८ बाद ३३७ धावा केल्या. भारताकडून गोलंदाजी करताना अर्शदीप सिंग आणि हर्षित राणा यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या. मोहम्मद सिराज आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

## इकडं बांगलादेशचं रडगाणं काही केल्या संपेना, तिकडं आयर्लंडचा सुद्धा ठाम नकार!






मुंबई –भारत आणि श्रीलंका यांच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या आयसीसी पुरुष टी२० विश्वचषक २०२६ भोवती सुरू असलेला वाद वाढतच चालला आहे. प्रथम, भारत आणि पाकिस्तानला गटबद्ध करण्यावरून वाद झाला. त्यानंतर, बांगलादेशने भारतात सामने खेळण्यास नकार दिला आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेची स्पर्धेच्या संघटनेबाबतची डोकेदुखी वाढली आहे. आयसीसीसोबत झालेल्या बैठकीत, बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) बांगलादेश आणि आयर्लंडने गटांची अदलाबदल करण्याचा प्रस्ताव मांडला, ज्यामुळे बांगलादेशचे सामने श्रीलंकेत हलवले जातील. बोर्डाने असा युक्तिवाद केला की यामुळे लॉजिस्टिक बदल कमी होतील.तथापि, क्रिकेट आयर्लंडने बांगलादेशसोबत गटांची अदलाबदल करण्याचा प्रस्ताव पूर्णपणे नाकारला आहे, ज्यामुळे बीसीबीची परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे. क्रिकेट आयर्लंडने स्पष्ट केले आहे की त्यांच्या संघाचे वेळापत्रक जसेच्या तसे राहील, म्हणजेच ते त्यांचे सर्व गट–टप्प्याचे सामने श्रीलंकेतील कोलंबोमध्ये खेळतील.आयर्लंड बोर्डाने काय म्हटले?

क्रिकेट आयर्लंडच्या एका अधिकाऱ्याने क्रिकबझला सांगितले की, ''आम्हाला आयसीसीकडून स्पष्ट आश्वासन मिळाले आहे की आम्ही मूळ वेळापत्रकापासून विचलित होणार नाही. आम्ही निश्चितच गट स्टेज श्रीलंकेत खेळू.'' या विधानामुळे बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या आशांना थेट धक्का बसला आहे. बांगलादेश बोर्ड सतत आयसीसीला त्यांचे सामने भारताऐवजी श्रीलंकेत खेळवण्याची विनंती करत आहे. बांगलादेश सरकारने संघ, चाहते, मीडिया आणि सपोर्ट स्टाफच्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त केली आहे. परिणामी, बांगलादेश बोर्डाने आयसीसीने बांगलादेशचे सामने श्रीलंकेत हलवावेत आणि आयर्लंडसोबत गट अदलाबदलीचा विचार करावा अशी मागणी केली आहे. बीसीबीचा असा विश्वास आहे की हे केवळ गट अदलाबदलीद्वारे शक्य होऊ शकते, परंतु आयर्लंडच्या नकारामुळे हा मार्ग बंद झाला आहे. सध्याची परिस्थिती अशी आहे की बांगलादेशी संघ भारतात खेळण्यास सहमत नाही. आयसीसी वेळापत्रक बदलण्यास देखील तयार नाही. शिवाय, आयर्लंड गट अदलाबदलीला मान्यता देत नाही. यामुळे स्पर्धेवर शंका निर्माण झाली आहे. आयसीसी पर्यायांवर विचार करत आहे, परंतु अद्याप कोणताही अधिकृत निर्णय झालेला नाही. टी–२० विश्वचषकासाठी बांगलादेशचा गट क मध्ये वेस्ट इंडिज, इंग्लंड, नेपाळ आणि इटलीसह समावेश आहे. बांगलादेश कोलकाता येथे तीन आणि मुंबईत एक सामना खेळेल. आयर्लंडचा गट ब मध्ये श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, झिम्बाब्वे आणि ओमानसह समावेश आहे. आयर्लंडचे तिन्ही गट सामने श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे होणार आहेत.

## अनसोल्ड राहिलेल्या डॅरेल मिचेलने टिम इंडियाच्या सर्व गोलंदाजांना झोडपलं

मुंबई –गेल्या महिन्यात दुबईत झालेल्या आयपीएल ऑक्शनमध्ये अनसोल्डचा शिक्का माथी बसलेल्या डॅरेल मिचेलने भारताविरुद्धच्या मालिकेत वचपा काढला. ऑक्शनमध्ये दहापैकी एकाही संघाने स्वारस्य न दाखवलेल्या मिचेलने आपली ताकद भारतात येऊन दाखवली. इंदूर वनडेत मिचेलने सलग दुसऱ्या शतकाची नोंद केली. मिचेलच्या शतकाच्या बळावर न्यूझीलंडने भारतासमोर ३३८ धावांचं लक्ष्य दिलं आहे. तीन सामन्यांच्या मालिकेत, मिचेलने दोन शतकं आणि एक अर्धशतक झळकावलं. बडोद्यात मिचेलने ८४ धावा केल्या. राजकोटमध्ये मिचेलच्या नाबाद १३१ धावांच्या खेळीच्या बळावर न्यूझीलंडने तीनशेपेक्षा जास्त धावांचा यशस्वी पाठलाग केला. आज इंदूर इथे सुरू असलेल्या लढतीत मिचेलने १३७ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली.

१६ डिसेंबर रोजी दुबईत झालेल्या आयपीएल ऑक्शनवेळी मिचेलची बेस प्राईज २ कोटी रुपये होती. मोठी खेळी करू शकण्याची क्षमता, फटकेबाजीची ताकद, उपयुक्त मध्यमगती गोलंदाज आणि अफलातून क्षेत्ररक्षक ही ओळख असूनही मिचेलला ताफ्यात घेण्यात कुठल्याच संघाने स्वारस्य दाखवलं नाही. अनेक माजी खेळाडूंनी मिचेलला न घेण्यावरून आश्चर्य व्यक्त केलं होतं.

### सलग दुसऱ्या सामन्यात शतक




२०२२ मध्ये मिचेल राजस्थान रॉयल्स संघाकडून खेळला होता. २०२४ मध्ये चेन्नई सुपर किंग्सने तब्बल १४ कोटी रुपये खर्चून मिचेलला संघात घेतलं. १३ सामन्यात त्याने १४२.६०च्या स्ट्राईकरेटने ३१८ धावा केल्या. यामध्ये दोन अर्धशतकांचा समावेश होता. मिचेलची कामगिरी वाईट नव्हती मात्र चेन्नईची कामगिरी यथातथाच राहिली. बेन स्टोक्सऐवजी चेन्नईने मिचेलचा विचार केला. मात्र स्टोक्स विशेषज्ञ गोलंदाजाप्रमाणे गोलंदाजी करतो. मिचेल गोलंदाजीत तसं योगदान देऊ शकला नाही. त्यामुळे पुढच्या हंगामात चेन्नईने त्याला रिटेन केलं नाही.

भारताविरुद्ध वनडेत मिचेलने १३ सामन्यात ७४च्या सरासरीने ७४१ धावा केल्या आहेत. यामध्ये ४ शतकं आणि २ अर्धशतकांचा समावेश आहे. २०२३ मध्ये मिचेलने धरमशाला इथे १३० धावांची खेळी केली होती. काही दिवसांनंतर वर्ल्डकप सेमी फायनलमध्ये मिचेलने १३४ धावांची खेळी साकारली होती. भारताविरुद्ध त्याची बॅट तळपते.

३४वर्षीय मिचेल हा न्यूझीलंडच्या फलंदाजीचा आधारस्तंभ आहे. टेस्ट, वनडे आणि टी२० अशा तिन्ही प्रकारात खेळतो. फिरकीविरुद्ध खेळण्यासाठी आवश्यक तंत्र त्याच्याकडे आहे. ३५ टेस्ट, ५८ वनडे आणि ९० टी२० सामन्यात त्याने न्यूझीलंडचं प्रतिनिधित्व केलं आहे. आयपीएलव्यतिरिक्त लाहोर क्लँडर्स, टेक्सास सुपर किंग्स, लंडन स्पिरीट या संघांसाठीही तो खेळतो.

# कुणालाही न जमलेलं करून दाखवलं! भारताविरुद्ध डॅरिल मिशेलचा वर्ल्ड रेकॉर्ड

नवी दिल्ली –भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील निर्णायक सामना इंदूरच्या होळकर स्टेडियमवर खेळवला जात आहे. या सामन्यात न्यूझीलंडचा स्टार फलंदाज डॅरिल मिशेल याने पुन्हा एकदा भारताविरुद्ध आपली जबरदस्त फॉर्म दाखवत शानदार शतकी खेळी केली. मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात शतक झळकावत न्यूझीलंडला संस्मरणीय विजय मिळवून दिल्यानंतर, तिसऱ्या वनडेतही मिचेलने शतक ठोकत टीम इंडियाला अडचणीत टाकले.

भारताविरुद्ध चौथं शतक

न्यूझीलंडसाठी डावाची सुरुवात फारशी चांगली ठरली नाही. अवघ्या ५८ धावांत संघाचे तीन फलंदाज तंबूत परतले. मात्र, डॅरिल मिशेलने पुन्हा एकदा संयमी आणि आक्रमक खेळी करत डाव सावरला. त्याने ५६ चेंडूमध्ये अर्धशतक पूर्ण केलं. यानंतर ग्लेन फिलिप्ससोबत झालेल्या महत्त्वाच्या भागीदारीमुळे न्यूझीलंडचा स्कोअर २००




### क्रिकेट विश्व अचंबित




धावांच्या पुढे गेला. अखेरीस मिचेलने १०६ चेंडूमध्ये आपलं शतक पूर्ण केलं. भारताविरुद्ध केवळ १३ सामन्यांत मिचेलने ४ शतकं झळकावली आहेत. विशेष म्हणजे, या मालिकेतील तिन्ही सामन्यांत त्याने ५० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत.

भारतात नवा जागतिक विक्रम

डॅरिल मिशेलने एक ऐतिहासिक कामगिरी करत भारतामध्ये भारताविरुद्ध सलग पाच वनडे डावांत ५० पेक्षा अधिक धावा करणारा जगातील पहिला फलंदाज होण्याचा मान पटकावला आहे. हा विक्रम त्याने २०२३ च्या वनडे विश्वचषकापासून सुरू ठेवला आहे. २०२३ वर्ल्ड कपच्या लीग स्टेजमध्ये त्याने भारताविरुद्ध १३० धावा, तर वानखेडे स्टेडियमवर झालेल्या उपांत्य सामन्यात १३४ धावांची दमदार शतकी खेळी केली होती.

चालू मालिकेतही वर्चस्व कायम

सध्याच्या वनडे मालिकेतही मिचेलचा दबदबा कायम आहे. वडोदऱ्यातील पहिल्या वनडेत ८४ धावा केल्या. तर दुसऱ्या वनडेत नाबाद १३१ धावा ठोकल्या. इंदूरमधील तिसऱ्या वनडेत त्याने शतक ठोकले.

भारतात खेळलेल्या मागील ५ वनडे डाव

१३० धावा – २०२३ वनडे वर्ल्ड कप

१३४ धावा – २०२३ वनडे वर्ल्ड कप (उपांत्य सामना)

८४ धावा – पहिला वनडे (सध्याची मालिका)

१३१ धावा – दुसरा वनडे (सध्याची मालिका) १००ङ+ धावा – तिसरा वनडे (सध्याची मालिका) हे सर्व सामने भारतात खेळले गेले आहेत. एकूणच पाहता, मिचेलने भारताविरुद्ध सलग चार वनडे डावांत ५० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत. या मालिकेची सुरुवात चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अंतिम सामन्यातील ६३ धावांच्या खेळीतून झाली होती. त्यानंतर सध्याच्या मालिकेतील तिन्ही सामन्यांत अर्धशतक झळकावत मिचेलने क्रिकेट इतिहासात आपलं नाव कोरलं आहे.

## जेष्ठ पत्रकार समाजभूषण भुजंग उर्फ उत्तम माधवराव कांबळे यांना शिवशंभु पुरस्कार

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार साप्ताहिक राष्ट्रप्रेम वृत्तपत्राचे संपादक तथा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त समाजभूषण श्री भुजंग माधवराव कांबळे उर्फ उत्तम कांबळे यांना शिवशंभु हा पुरस्कार जाहीर



झाला असून हा पुरस्कार वीर शिवशंभु संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील श्री पांडुरंग लॉन्स जामगाव रोड येथे हा पुरस्कार संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते श्री अंबादासदादा दानवे, खा. धाराशिव श्री ओमप्रकाशदादा निंबाळकर, मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आ. श्री सतिषभाऊ चव्हाण, गंगापूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष श्री संजयभाऊ जाधव, शिवशंभु संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्री हनुमंत वडजे पाटील यांच्या उपस्थितीत देण्यात येणार असून या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय युवती अध्यक्ष शरदचंद्र पवार गट श्रीमती सक्षणाताई सलगर, आ. श्री विलासबापू भुमरे पैठण आणि महिला जिजाऊ फाउंडेशन अध्यक्ष सौ. सुवर्णाताई जाधव आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये देण्यात येणार असून गेल्या ४० वर्षात पत्रकार, संपादक व सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर राहून निस्वार्थी भावनेने व विचाराने समाजभूषण श्री भुजंग उर्फ उत्तम कांबळे यांनी निस्वार्थी भावनेने व विचाराने कार्य प्रामाणिकपणे करीत आहेत.

## नांदेडमध्ये साकारणार ५२ एकरांवर 'हिंद-दी-चादर' चा भव्य ऐतिहासिक सोहळा !

**८ ते १० लाख भाविकांच्या स्वागतासाठी प्रशासन सज्ज; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची माहिती**



**लातूर/प्रतिनिधी :** शीख धर्माचे नववे गुरु 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड नगरी एका ऐतिहासिक पर्वाची साक्षीदार होणार आहे. राज्य शासनाच्या वतीने २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. ५२ एकरांच्या विशाल परिसरात गुरुद्वाराची भव्य प्रतिकृती साकारण्यात येत असल्याची माहिती नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज दिली.

**५२ एकरांवर अध्यात्मिक नगरी**

या सोहळ्यासाठी प्रशासनाने ५२ एकर जागेवर भव्य मंडप उभारला आहे. भाविकांच्या सोयीसाठी ८ महालंगर, अत्याधुनिक प्रदर्शन केंद्र (Exhibition Center), साडेतीनशेहून अधिक स्टॉल्स आणि आरोग्य शिबिरे उभारण्यात येत आहेत. भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला आहे.

**दिग्गजांची मांदियाळी**

या सोहळ्यास देशाचे गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेक मंत्री व संत-महात्मे उपस्थित राहणार आहेत.

**सेवाभावी संस्थांना आवाहन**

देशभरातून सुमारे ८ ते १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याचा अंदाज आहे. या भाविकांच्या सेवेसाठी ज्या स्वयंसेवी संस्थांना (NGOs) सेवा द्यायची आहे किंवा स्टॉल्स लावायचे आहेत, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहनही कर्डिले यांनी केले आहे. प्रशासनातर्फे त्यांना जागा उपलब्ध करून दिली जाईल. या ऐतिहासिक सोहळ्यात सर्व नांदेडकरांनी आणि भाविकांनी सहकुटुंब सहभागी होऊन या अभूतपूर्व सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# भाजपातर्फे कामखेडा जिप मतदार संघातून सौ. सरिता भिसे यांची तर पोहरेगाव जि.प. साठी सौ. मनीषा सरवदे यांची उमेदवारी जाहीर

## रेणापूर तालुक्यातील जि.प, पं.स च्या सर्वच जागेवर भाजपाचा विजय होणार – आ. रमेशआप्पा कराड




**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर बरोबरच लातूर पंचायत समितीवर यावेळी भाजपचा झेंडा फडकणार असून रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या चार आणि पंचायत समितीच्या आठही जागेवर भाजपाचा विजय होणार असा आत्मविश्वास व्यक्त करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघातून सौ. सरिता शंकरराव भिसे, कामखेडा पंस गणातून शरद दरेकर, मोटेगाव पंस गणातून संतोष चव्हाण यांची तर पोहरेगाव जिल्हा परिषद गटातून सौ. मनीषा दशरथ सरवदे निवाडा पंस गणातून प्रा. विष्णू गोरे यांची भाजपाच्या वतीने उमेदवारी जाहीर केली.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघाचा विजय संकल्प मेळावा शुक्रवारी सायंकाळी रेणापूर तालुक्यातील मौजे भोकरंबा येथे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे हे होते. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, सेवानिवृत्त सनदी अधिकारी शंकरराव भिसे, भाजपाचे नवनाथ भोसले, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभा आकनगिरे, माजी सभापती अनिल भिसे, भाजपाचे दशरथ सरवदे, मंडलाध्यक्ष शरद दरेकर, सरपंच संघटनेचे अध्यक्ष विजय गंभीरे, सरपंच राजू हाके, उपसरपंच राजू शेख, विष्णू गोरे, ज्ञानोबा भिसे, राम मोरे, अजय गुडे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडलेल्या या मेळाव्यास अनेक गावचे सरपंच लोकप्रतिनिधी, भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यासह हजारोचा जनसमुदाय उपस्थित होता. यात महिलांची मोठी संख्या होती. आ. कराड यांचे भोकरंबा गावात आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करत वाजत गाजत जोरदार स्वागत करण्यात आले.

या मेळाव्यात बोलताना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या साठ वर्षात काँग्रेसने गरिबांना गरीबच ठेवण्याचे पाप केले. नरेंद्रजी मोदी यांच्या रूपाने देशात आणि देवेंद्रजी फडणवीस यांच्या रूपाने राज्यात परिवर्तन झाले आणि खरा विकास काय असतो हे त्यांनी दाखवून दिले. गोरगरीब अठरा पगड जाती धर्मासाठी अनेक योजना सुरू करून त्याचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम केले. गेल्या पंधरा वर्षात रेणापूर भागाला काँग्रेसवाल्यांनी विकासापासून वंचित ठेवण्याचे काम केले. सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या मेहनतीने, कष्टाने आणि मतदारांच्या आशीर्वादाने प्रस्थापिताची सत्ता उलटून टाकण्याचे काम झाले. मला विधानसभेत काम करण्याची संधी मिळाली. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यानंतर या भागाला न्याय देण्याचे आणि गोरगरिबांची सेवा करण्याचे काम करत असून आम्ही जे बोलतो ते करून दाखवतो असे सांगितले.

काँग्रेसवाल्यांनी आमदार असतानाही त्र्यंबकनानांना आणि वैजनाथ दादांना काहीच काम करू दिले नाही. पोहरेगाव भागातील खराब रस्त्याचे पाप कोणाचे आहे असा प्रश्न उपस्थित केला. विकासाची दिशा दिसली म्हणूनच त्र्यंबकनाना भिसे यांनी भारतीय जनता पार्टी प्रवेश केला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, आजपर्यंत मी एकटाच देशमुखाविरुद्ध लढत होतो आता त्र्यंबकनानाच्या माध्यमातून मला एक खंबीर साथीदार मिळाला आहे. ३० – ४० वर्षानंतरही मांजरा, रेणा साखर कारखान्यावर आज कोट्यावधी रुपयाचे कर्ज कसे या प्रश्नाचे उत्तर स्वतःला स्वच्छ, प्रामाणिक साखरसम्राट समजणाऱ्यांनी द्यावे. या साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या कष्टाची चोरी करून मिळवलेला पैसा प्रत्येक निवडणुकीत वापरला जातो. याचा जाब विचारल्याशिवाय काँग्रेसवाले जमीनवर येणार नाहीत असेही त्यांनी बोलून दाखवले.

केंद्रात भाजपाची राज्यात भाजपाची सत्ता असल्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत भाजपाची सत्ता आल्याशिवाय ग्रामीण भागाच्या विकासाला गती मिळणार नाही. रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या चार आणि पंचायत समितीच्या आठही जागा बहुमताने जिंकण्याचा संकल्प करण्यासाठी हा मेळावा असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघातून सौ. सरिता शंकरराव भिसे, कामखेडा पंस गणातून शरद दरेकर, मोटेगाव पंस गणातून संतोष चव्हाण यांची तर पोहरेगाव जिल्हा परिषद गटातून सौ. मनीषा दशरथ सरवदे निवाडा पंस गणातून प्रा. विष्णू गोरे यांची भाजपाच्या वतीने उमेदवारी जाहीर केली. विकास कामाच्या आधारावर रेणापूर तालुक्यात भाजपाचे सर्वच्या सर्व उमेदवार बहुमतानी विजयी व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत असे आव्हान केले.

स्व. विलासराव देशमुख आश्वासक नेतृत्व होते त्यांनी कधीच कार्यकर्त्यांचा कामापुरता वापर केला नाही आज काँग्रेसकडे तसे आश्वासक नेतृत्व दिसत नाही मला अनेक वाईट अनुभव आले असल्याचे सांगून या मेळाव्यात बोलताना माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे म्हणाले की, नरेंद्र मोदी आणि देवेंद्रजी फडणवीस हे विकासात्मक, आश्वासक नेतृत्व देशाला आणि राज्याला लाभले आहे. त्यांच्या माध्यमातून सर्वत्र विकासाची मोठी कामे होत आहेत. आमदार असताना राज्यातील सत्तेवर असलेल्या भाजपा सरकारने कोणतेही काम घेऊन गेलो तर कधीच दुजाभाव केला नाही. भाजपाच्या माध्यमातूनच विकास कामे होऊ शकतात याची खात्री पटल्यानेच मी भाजपात प्रवेश केला असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

रमेशआप्पा सर्व सामान्यांना चोवीस तास उपलब्ध असणारे सक्षम आमदार आहेत त्यांच्या माध्यमातून मतदार संघात विकासाची अनेक कामे होत असल्याचे सांगून त्र्यंबकनाना भिसे म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना गरजूपर्यंत शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्यासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात घेणे गरजेचे असून येत्या पाच तारखेला रेणापूर तालुक्यातील सर्वच्या सर्व भाजपाचे उमेदवार विजयी करून रमेशआप्पा कराड यांच्या पाठीशी ताकद उभी करावी असे आवाहन केले.

युवा नेते ऋषिकेशदादा कराड यावेळी बोलताना म्हणाले की, विकास कामासाठी या मतदारसंघाला वीस वर्ष संघर्ष करावा लागला रमेशआप्पांच्या माध्यमातून या मतदार संघात विकास कामे होत असताना दिसत आहेत. शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी कायमस्वरूपी सुरू ठेवण्यासाठी मतदारांनी भाजपाच्या पाठीशी कर्ज म्हणून आशीर्वाद द्यावेत. येणाऱ्या काळात निश्चितपणे अपेक्षेपेक्षा अधिक काम करून व्याजा सगट कर्जाची परतफेड करण्याची क्षमता भाजपाची आहे. विधानसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे रमेशआप्पा कराड साहेबांवरती विश्वास टाकला त्याचप्रमाणे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारावर विश्वास ठेवून आशीर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे यांनी आपले मनोगत व्यक्त करून रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपाला साथ द्यावी असे आवाहन केले. प्रारंभी माजी सभापती अनिल भिसे यांनी आपल्या प्रास्ताविकातून मेळाव्याच्या आयोजना मागची भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे, प्रा. धायगुडे यांनी केले तर शेवटी श्रीमंत नागरगोजे यांनी आभार मानले.

यावेळी अभिषेक आकनगिरे, पद्माकर चिंचोलकर, साहेबराव मुळे, रमेश खाडप, रवींद्र नागरगोजे, परमेश्वर जाधव, श्रीकृष्ण पवार, सुनील चेवले, नवनाथ माने, राजेश घोडके, किशन क्षिरसागर, दौलत पवार, अजित पाटील, नानासाहेब कसपटे, रेणापूर नगरपंचायतीचे दत्ता सरवदे, श्रीकृष्ण मोटेगावकर, विजय चव्हाण, महेश गाडे, रमेश खाडप, मारूफ आत्तार, शेख अजीम, विश्वजीत कदम, राहुल नागरगोजे, दीपक पवार, शिवाजी सोमवंशी, बाळासाहेब मुदामे, परमेश्वर बिडवे, अनंत पाटील, राज जाधव, बालाजी राठोड, धनंजय पवार, नरेश चपटे, निळकंठ भिसे, हुजूर शेख, संतोष रांजणे, सुदीप भिसे, हाजी शेख, नवनाथ रांजणे, राहुल भिसे, नय्युम शेख, अजय राठोड, सचिन शिंदे, दिलीप हेडे, मंजूर पठाण, ज्ञानेश्वर भिसे, रमेश रांजणे, जाकीर शेख, मारुती गोरे, दाजी साहेब हाके, अकबर शेख, नरसिंह गोरे, समीर पठाण, रफिक शेख, अफजल पठाण, शशिकांत हाके, मोहन हाके, मतीन शेख, नितीन गोरे, कमलाकर भिसे यांच्यासह आणि कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघातील भोकंरबा गावासह विविध गावागावातील वाडी वस्तीतील भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी मतदार बंधू भगिनी हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

# नियोजन समितीसह सर्वच समित्या, महिलांच्या हाती सोपविल्याने निलंगा नगरपालिकेत महिलाराज

**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा नगरपालिकेसाठी नुकत्याच झालेल्या २०२५- २६ च्या निवडणुकीमध्ये निलंगा विधानसभेचे लोकप्रिय आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर व अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी पक्षाने नगराध्यक्ष संजय राज प्रमोद हलगरकर यांच्यासह १५ नगरसेवक निवडून आणून एक हाती सत्ता मिळवली यानंतर निलंगा शहरातील जनतेने दाखवलेला विश्वास व लाडक्या बहिणी व माता-भगिनी यांचा सन्मान करण्यासाठी निलंगा नगरपालीकेवर महिलांना कारभार सोपवूण पालीकेवर महिलाराज आणला आहे.



निलंगा नगरपालिकेच्या कारभारामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व निलंगा वाशियाची सेवा करण्यासाठी स्थायी समितीच्या अध्यक्षपदी विद्यमान नगराध्यक्ष संजयराव हलगरकर तर नियोजन समितीच्या अध्यक्षपदी फुलारी आशाताई रविशंकर, बांधकाम सभापती म्हणून मोहोळकर पूजाताई दत्तात्रय, पाणीपुरवठा सभापती पदी हाडोळे सोनाली ताई गोपाळराव, स्वच्छता आरोग्य व दिवाबत्ती सभापतीपदी वाघमारे सुधाताई मारुती, तर महिला व बालकल्याण समितीच्या सभापती पदी निलंगेकर मीनाक्षी शरदराव तर उपसभापतीपदी कांबळे रंजनाताई यांची आज निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल भारतीय जनता पार्टीचे नेते लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर युवा नेते अरविंद भाऊ पाटील निलंगेकर तसेच नगराध्यक्ष संजय राज हलगरकर गटनेते वीरभद्र स्वामी यांनी त्यांचे अभिनंदन केले या विषय समितीच्या निवडी वेळी सर्वच नगरसेवक उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या अध्यक्षतेखाली पीठासन अधिकारी म्हणून तहसीलदार प्रसाद कुलकर्णी तसेच मुख्याधिकारी संतोष लोमटे यांनी कामकाज पाहिले.

**पालिकेवर महिलाराज आणून लाडक्या बहिणींचा सन्मान**

भारतीय जनता पार्टी व संभाजीराव निलंगेकर हे फक्त निवडणुका जिंकण्यासाठीच लाडकी बहीण योजनेचा वापर करीत नाहीत तर ज्या ज्या वेळेस संधी मिळेल त्या त्या वेळेस लाडक्या बहिणीचा सन्मान व बहुमान मिळवून देण्याचे काम ते करतात यासाठीच निलंगा शहरातील जनतेने दाखवलेला विश्वास लाडक्या बहिणींचा सन्मान करण्यासाठीच माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर व युवा नेते अरविंद भाऊ पाटील निलंगेकर यांनी एक अत्यंत धाडसी निर्णय घेत निलंगा पालिकेचा कारभार करण्याची संधी महिलांना उपलब्ध करून दिली महिला सुद्धा कोणत्याही कार्यक्षेत्रामध्ये कमी असणार नाही भारतीय जनता पार्टी प्रत्येक महिलेचा तितकाच सन्मान करतो जितका पुरुषांचा सन्मान होतो हे दाखवून देण्यासाठी पालिकेचा कारभार सक्षमपणे महिला चालवू शकतात यासाठीच विषय समित्या निवडीच्या वेळी संपूर्ण कारभार महिलांच्या हाती सोपवून पालिकेवर नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या अध्यक्षतेखाली महिलाराज आणून खऱ्या अर्थाने निलंगा शहरात लाडक्या बहिणी व माता-भगिनींचा सन्मान करण्याचे काम संभाजीराव निलंगेकर यांनी केले आहे याचे संपूर्ण निलंगा वाशियातून कौतुक केले जात आहे.

# सोपान यादवराव ठाकूर यांचा गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मान

**लातूर/प्रतिनिधी :** मूळचे निलंगा तालुक्यातील गौरचे रहिवासी असलेले विद्यार्थीप्रिय शिक्षक सोपान यादवराव ठाकूर यांना शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी गुणवंत शिक्षक सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



सोपान यादव यांचे संपूर्ण कुटुंबच अव्याहतपणे शिक्षण क्षेत्रामध्ये ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आले आहेत. त्यांचे वडील यादवराव ठाकूर हेही एक विद्यार्थीप्रिय तसेच उपक्रमशील शिक्षक म्हणून सेवारत होते. आपल्या सेवाकार्यात यादव गुरुजींनी असंख्य विद्यार्थ्यांना सहकार्य करण्याचे काम निरपेक्षपणे केलेले आहे. त्यांचे असंख्य विद्यार्थी आज विविध शासकीय - निमशासकीय क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. ज्ञानदान हेच आपल्या जीवनाचे सार मानून चालणाऱ्या यादवराव गुरुजींनी आपल्या मुली - मुलांनाही शिक्षण क्षेत्रात विद्यादानाचे कार्य करण्यास प्रेरित केले. त्यांचे चिरंजीव सोपान ठाकूर हे मागच्या सतरा वर्षांपासून नाशिक जिल्ह्यात विद्यादानाचे पवित्र कार्य करत आहेत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या तालुकास्तरीय त्रैवर्षी अधिवेशनात त्यांचा मानचिन्ह , शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. हा गौरव आपला एकट्याचा नसून आपल्याला सहकार्य करणाऱ्या सर्व सहकारी, कुटुंबीय यांचा असल्याची भावना याप्रसंगी त्यांनी व्यक्त केली. सध्या सेवानिवृत्त जीवन व्यतीत करणारे आपले पिताश्री यादवराव ठाकूर यांच्या सततच्या प्रेरणेने आणि प्रोत्साहनामुळे आपण शिक्षण क्षेत्रात चांगली कामगिरी करू शकत असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले.

या पुरस्काराबद्दल दयानंद ठाकूर, सौ. बबिता ठाकूर, श्रीहरी जाधव, सुचिता ठाकूर, गोविंद ठाकूर, भागवत कवठेकर, अमोल सावंत, मनोज जांभळदारे ,गोपाळ जांभळदारे,तुकाराम चामे यासह संपूर्ण कुटुंबिय , मित्रमंडळींकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.


**प्रो. जडे यांचे रबरी शिक्के**
**कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले**
**टिकाऊ रबरी शिक्के**
**तयार करून मिळतील.**




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# जिल्हा परिषद-पंचायत समिती रणधुमाळीला वेग; भाजपची संघटनात्मक तयारी अंतिम टप्प्यात

धाराशिव (अंजुम शेख) आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात राजकीय हालचालींना वेग आला असून भारतीय जनता पक्षाने निवडणूक रणनितीची तयारी जवळपास पूर्ण केली आहे. महायुतीच्या माध्यमातून ताकदीने निवडणूक लढवण्याची स्पष्ट भूमिका भाजपकडून मांडण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती व जिल्हा परिषद गटांमध्ये इच्छुक उमेदवारांची संख्या लक्षणीय असून पक्ष कार्यालयात उमेदवारीसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. अल्पावधीतच मोठ्या संख्येने इच्छुकांनी अर्ज सादर केल्याने भाजपची संघटनात्मक ताकद पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. निवडणूक नियोजनाबाबत पक्ष नेतृत्वाकडून कार्यकर्त्यांशी सातत्याने संवाद साधण्यात येत असून, तळागाळातील कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनच निवडणूक रणनीती आखली जात आहे.

उमेदवार निवडीत पारदर्शकता ठेवली जाईल, कोणावरही अन्याय होणार नाही, असा विश्वास पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आला आहे. नगरपालिका निवडणुकांतील यशानंतर आता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्येही महायुतीला ऐतिहासिक यश मिळेल, असा विश्वास भाजप पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. विकास, संघटन आणि शिस्तबद्ध नियोजन या त्रिसूत्रीवर ही निवडणूक लढवली जाणार असून जिल्ह्यातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत चालले आहे. एकूणच, चालू घडामोडी पाहता जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका या जिल्ह्यातील राजकारणाला नवी दिशा देणाऱ्या ठरण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# धाराशिव नगरविकासाचा नवा अध्याय : नगराध्यक्ष नेहा ताई काकडे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेचा वेगवान प्रवास



धाराशिव ( रामेश्वर डोंगरे)- नगरपालिकेच्या विकासाचा आराखडा अधिक भक्कम करण्यासाठी नगराध्यक्ष नेहा ताई काकडे यांनी ठोस आणि लोकाभिमुख निर्णयांची मालिका सुरू केली आहे. शहराच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करत त्यांनी स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, आरोग्य व नागरी सुविधा या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल आढावा घेतला आहे. नगरपालिकेच्या आगामी कामकाजामध्ये शहरातील अंतर्गत रस्त्यांचे मजबुतीकरण, पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा विस्तार, ड्रेनेज लाईन दुरुस्ती व नवीन लाईन टाकणे, तसेच स्वच्छ धाराशिव अभियान अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी तातडीने सोडवण्यासाठी जनतेशी थेट संवाद ही कार्यपद्धती नेहा ताई काकडे यांनी अधिक सक्रिय केली आहे. या विकास प्रक्रियेत नगरसेवक राहुल काकडे यांचेही मोलाचे योगदान लाभत आहे. नगरसेवक म्हणून ते सातत्याने प्रभागातील प्रश्न मांडत असून, नागरिकांच्या समस्या नगरपालिकेच्या पातळीवर प्रभावीपणे पोहोचवत आहेत. नेहा ताई काकडे यांचे पती असलेले राहुल काकडे हे जबाबदारीची जाणीव ठेवून लोकहितासाठी काम करत असल्याचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे. नगराध्यक्ष नेहा ताई काकडे आणि नगरसेवक राहुल काकडे यांचा समन्वय, नियोजनबद्ध कामकाज आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यामुळे धाराशिव नगरपालिकेच्या पुढील काळातील विकासकामांना निश्चितच नवी दिशा मिळणार आहे.

नागरिकांच्या विश्वासावर आधारित, पारदर्शक व गतिमान प्रशासन हेच त्यांच्या कार्याचे प्रमुख वैशिष्ट्य ठरत आहे.

# तुळजाभवानी महाविद्यालयात विवेकानंद सप्ताह अंतर्गत ज्ञानशिदोरी दिन विविध उपक्रमाने उत्साहात संपन्न



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापूर येथे विवेकानंद सप्ताहतंर्गत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचा वाढदिवस *ज्ञानशिदोरी दिन* विविध अभिनव उपक्रमाने महाविद्यालयात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग यांच्या वतीने वाढदिवसाचे औचित्य साधून. ज्ञानशिदोरी दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन , वाचन संकल्प , महाविद्यालयाचे प्राचार्य,प्रमुख पाहुणे, गुरुदेव कार्यकर्ते यांच्या हस्ते ज्ञानशिदोरी वाटप (विद्यार्थ्यांना वाचनीय पुस्तके,ग्रंथ वाटप) करण्यात आले. तसेच विविध उपक्रम मोठ्या उत्साहाने , यशस्वीपणे राबविण्यात आले. ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन मा. प्राचार्य जीवन पवार, प्रमुख पाहुणे ,गुरुदेव कार्यकर्ते यांच्या हस्ते करण्यात आले तसेच विवेकानंद सप्ताहाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना आणि एन सी सी यांच्या वतीने व उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे , आरोग्य तपासणी शिबिर याचे आयोजन करण्यात आले, यावेळी एकुण ३० रक्तदात्यांनी रक्तदान केले. ६० विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या आरोग्य तपासणी अंतर्गत उइउ तपासणी रक्तगट तपासणी करण्यात आली. तसेच आदरणीय कार्याध्यक्ष साहेब यांच्या जन्मदिनानिमित्त महाविद्यालय व महाविद्यालय परिसरात मान्यवर, प्रमुख पाहुणे , महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच महाविद्यालयामध्ये मार्गदर्शन पर व्याख्यान प्रा. डॉ. विनोदकुमार वायचळ (हिंदी विभागप्रमुख, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव) यांचे *स्वामी विवेकानंद आणि आजचा युवक* या विषयावर सखोल मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. इत्यादी विविध उपक्रमांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांचा ८१ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात आनंदात साजरा करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन पवार, विवेकानंद सप्ताहाचे संयोजक आणि विभाग प्रमुख डॉ. मंत्री आडे, डॉ. बापुराव पवार. डॉ. नेताजी काळे, प्रा. बालाजी कऱ्हाडे, प्रा. स्वाती बैनवाड, ग्रंथपाल डॉ. दीपक निकाळजे,प्रा.गोकुळ बाविस्कर, प्रा. निलेश एकदंते , प्रा. सुदर्शन गुरव, प्रा. बाळू कुकडे, प्रा. राणुबाई कोरे, डॉ.तांबोळी मॅडम प्रा. ज्योतिर्लिंग क्षीरसागर, प्रा. सतीश वागतकर प्रा. अनिल नवत्रे, प्रा. शिवाजी जगताप, तसेच महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंधन बचत करणे ही काळाची गरज - प्राचार्य केशव पवार
## कळंब आगारात इंधन बचत मोहिमेचा उत्साहात शुभारंभ !

कळंब (प्रतिनिधी)-सध्याच्या परिस्थितीत इंधन बचत करणे ही केवळ गरज नसून काळाची अपरिहार्यता आहे. इंधनाची बचत करून राष्ट्राच्या विकासाला हातभार लावला पाहिजे, असे प्रतिपादन कळंब आगार संत श्रेष्ठ गोरोबा काका शाशकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चे प्राचार्य केशव पवार यांनी केले.

राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने दि. १६ जानेवारी ते १५ फेब्रुवारी या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या इंधन बचत मोहिमेचा शुभारंभ दि. १६ जानेवारी रोजी कळंब बस आगारात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक विनोद अलकुंठे हे होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय यंत्र अभियंता सुर्यकांत थोरबोले, संतश्रेष्ठ गोरोबाकाका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चे प्राचार्य केशव पवार, नितेश पडद्यन ,प्रा. मोहन जाधव, कार्यशाळा अधीक्षक बालाजी भारती, स्थानक प्रमुख सुरज पायाळ , निलेश जाधव यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी राज्य परिवहन महामंडळातील वाहक, चालक व यांत्रिक कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना इंधन बचतीचे महत्त्व सांगितले. इंधनाचा योग्य वापर करून प्रत्येक आगार तोट्यातून नफ्यात कसा आणता येईल, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रभाकर झांबरे यांनी मानले. या प्रसंगी वाहतूक नियंत्रक नामदेव जगताप, लखन कांबळे, श्रीमती शिंदे मॅडम, श्रीमती शेख मॅडम, वैभव बंडे, श्री चौवरे , विलास जाधव आदी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी यांत्रिक कर्मचारी, वाहक व चालकांनी विशेष परिश्रम घेतले. इंधन बचत मोहिमेमुळे आगाराच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन एसटी महामंडळाला आर्थिक बळकटी मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.


## Name of Change Declaration

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **DAPKE DESHMUKH DIGGAJ RAMESHRAO** TO **DIGGAJ RAMESH DAPKE DESHMUKH** Hence for this Declaration i will be known by this name and will use . in future the **DAPKE DESHMUKH DIGGAJ RAMESH** will used by my family husband /wife, children and relative.

OLD NAME :-**DAPKE DESHMUKH DIGGAJ RAMESHRAO**
NEW NAME:- **DIGGAJ RAMESH DAPKE DESHMUKH**
Address :- 27/510, SAMTA NAGAR, OSMANABAD.
DIST. OSMANABAD - 413501
AADHAR NO.- 988442895051
Mob. No.-9223397777

## लातूर समाचार धाराशिव
## बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
## 9422472502
## 9175325708


# राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे खानापूर येथे वृक्षारोपण

१६ जानेवारी २०२६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचालित के .टी.पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत युथ फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट विथ स्पेशल फोकस ऑन वॉटरशेड मॅनेजमेंट न्ड वेस्टलँड मॅनेजमेंट मौजे खानापूर येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर राबविण्यात येत आहे.

या विशेष शिबिराच्या पाचव्या दिवशी रेवणसिद्ध महाराज मठ, ग्रामपंचायत कार्यालय परिसर, तलाठी कार्यालय परिसर, हनुमान मंदिर परिसर या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये चिंच, पेरू, जांभूळ, कडुलिंब, करंज, अशोक, निलगिरी, अशा विविध २५ रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच दुपारच्या सत्रात के.टी.पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात श्री. डॉ. मेघश्याम पाटील यांनी योगा व ध्यान या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी योगाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. वेदातील चार प्रकारांबद्दल माहिती सांगितली तसेच अष्टांग योगाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ध्यान केल्यामुळे शरीर स्वस्थ राहते व विविध प्रकारच्या शारीरिक समस्यांपासून आराम मिळतो. तसेच ध्यान केल्यामुळे एकाग्रता वाढवण्यासाठी मदत होते असे सांगितले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अतुलकुमार अलकुंटे, उपकार्यक्रमाधिकारी प्रा. शिवरत्न खरे, प्रा. पल्लवी हंगरगेकर, प्रा. प्रसाद मेनकुदळे व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४


## जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव (उपचिटणीस शाखा)

मेन रोड, धाराशिव पिनकोड - ४१३५०१ दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७३०१
Email Id-rdc1osmanabad@gmail.com

जा.क्र २०२४/उपचिटणीस/एमएजी-५/कावि-८४३/ सिआर-४९ दिनांक :- निम्नस्वाक्षरीत

### जाहिर प्रगटन
### (विस्फोटक नियम २००८ चे नियम १०७)

सर्व नागरिक मौजे तेरखेडा ता.वाशी जि. धाराशिव यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, तेरखेडा ता. वाशी जि. धाराशिव येथील जमीन गट नंबर **१३४२** मध्ये **वर्षा सचिन उकरंडे** रा. तेरखेडा ता. वाशी यांनी शोभेची दारू कब्जात ठेवून विक्री (फटाका विक्री) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ मिळणेसाठी अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. प्रस्तावित जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

**१. पूर्व बाजू - बाबासाहेब बळीराम घोलप**
**२. पश्चिम बाजू - बालाजी बाळासाहेब घोलप**
**३. दक्षिण बाजू - रस्ता**
**४. उत्तर बाजू - अब्दुल केदार शेख हुसेन**

सदर परवानगीबाबत स्थानिक चौकशीबाबत मा.पोलीस अधीक्षक, धाराशिव/कार्यकारी अभियंता म.रा.वि.वितरण कंपनी, धाराशिव/कार्यकारी दंडाधिकारी, वाशी/कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जि.प.धाराशिव, यांचेमार्फत झालेली आहे.

तरी, **वर्षा सचिन उकरंडे** ता. वाशी यांना मौजे. तेरखेडा ता. वाशी येथील जमीन गट नंबर १३४२ मध्ये शोभेची दारू कब्जात ठेवून (फटका विक्री) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २४ विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-५ ची परवानगी देणेबाबत कोणास **कांही आक्षेप असल्यास, सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले** पासून **(०८)** दिवसाचे आत समक्ष हजर राहून या कार्यालयास लेखी सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झालेस पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

Signed by
Vidyacharan Jagannath Kadavkar
Date:09-01-2026 13:23:37

स्वाक्षरित/-
**(विद्याचरण कडवकर)**
**अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव.**

**जिमाका/एके/जाहि/१२७**


# जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची त्रैमासिक बैठक निवडणूक काळात रद्द

धाराशिव,दि.१६ जानेवारी (जिमाका ) जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीच्या त्रैमासिक बैठकीची माहिती संबंधित पत्रान्वये दिली होती. ही बैठक दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती,धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

तथापि,जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक -२०२६ च्या अनुषंगाने प्रशासकीय कारणास्तव ही बैठक रद्द करण्यात आली आहे.नवीन दिनांक व वेळ यथावकाश जाहीर केले जातील. सदरील बदलाची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी,असे कळविण्यात आले आहे.

# किंमतीचे कॅनन डिजीटल कॅमेरा व त्याला लागणारी साहित्याची केली चोरी

तुळजापूर(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- नागय्या बसय्या मंडी, वय ३१ वर्षे, रा. चक्रकट्टा हनुमंत मंदीर जवळ गाजीपुर कलबुर्गी ता. कलबुर्गी यांचे अंदाजे ८,९४,८९५ किंमतीचे कॅनन डिजीटल कॅमेरा इओएस आर ५ एमके २ बॉडी, सोनी कॅमेरा मोडल आयएलसीई-७ एम४/बीक्यु एसआर नं८४६२७७६, सिग्मा८५एमएम१.४डीजीडीएन लेन्स, सिग्मा ५० एमएम डीजीडीएन लेन्स, रियर फिल्टर होल्डर आर एफ ३५ एमएम एफ१.४एलव्हीसीएम केस, आय फोन असे साहित्य कार्तिक एस रा. तिरुपती जिल्हा सेलम राज्य आंध्रप्रदेश यांनी दि.१५.०१.२०२६ रोजी दसरा एक्जिक्युटिव्ह येथे लॉजवर तुळजापूर येथुन चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- नागय्या मंडी यांनी दि.१६.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649